

अंक सोळा
व्हाईस ऑफ ट्रुथ
इंटरनॅशनल
THE VOICE OF TRUTH
INTERNATIONAL
Volume Sixteen

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | ३ |
| २) | तारण मिळण्यासाठी मी काय करू ?<br>- जे.सी.चोट | ९ |
| ३) | धीराने धावा<br>- जेरी बेट्स | १३ |
| ४) | ह्याचा काय अर्थ आहे की स्त्री<br>''बालकाला जन्म देण्याच्या योगे तारण पावेल''<br>- बेट्टी बर्टन चोट | १७ |
| ५) | पवित्रशास्त्र वाचणे आणि<br>समजून घेण्यासाठी काही विचार<br>- चार्ल्स स्कॉट | २१ |
| ६) | मंडळीचे महत्त्व<br>- विलियम वुडसन | २३ |
| ७) | एकतेसाठी एक विनंती<br>- जे.सी.चोट | २५ |
| ८) | खोटे शिक्षक<br>- वेयन बैरियर | २९ |
| ९) | तुम्ही येशूबरोबर काय कराल ?<br>- सनी डेविड | ३२ |
| १०) | शांती तर शांती देण्यानेच मिळेल<br>- टॉम हॉलैंड | ४१ |

११) केवळ एकच खरा परमेश्वर आहे ४३
- मेकसी बी. बोरेन
१२) येशू कशासाठी आला ? ४७
- जॉन एल. व्हीडर
१३) परमेश्वराच्या योजनेमध्ये ५३
यहुदी आणि अन्य जाती
- रॉयस फ्रेड्रीक
१४) पवित्र शास्त्राचे शब्द तुमचे ५६
सामर्थ्य वाढविण्यास सहाय्यक
- फैंटर डी. नार्दर्न
१५) पाप काय आहे ? ५९
- जिम सुधीत
१६) पवित्रशास्त्र अध्ययन ६०
- टॉम कैल्टन
१७) येशू ख्रिस्ताचा वधस्तंभ ६२
- हैस जे. डेडरसेक
१८) तारण मिळण्यासाठी मी काय करू ? ६५
- जे.सी.चोट
१९) पवित्र आत्मा कोण आहे ? ६९
- जे.सी.चोट

● ● ●



# संपादकीय

- अमुल बनसोड

**ता**रण ''प्रभूच्या नावात''...

ख्रिस्ती विश्वासाच्या गोष्टीत तसेच व्यवहाराच्या संबंधामध्ये येशूजवळ पूर्ण अधिकार आहे. आपल्या पित्याजवळ वर उचलण्या आधी, त्याने सांगितले होते की, ''स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे'' (मत्तय २८:१८). येशू आणि त्याच्या शिष्यांना या गोष्टीची माहिती होती की जर ते लोकांना, त्या तारणाला मानण्यासाठी सांगायला जात आहेत जे केवळ त्याच्याचद्वारे मिळते तर सांगणे आवश्यक होते. त्यांनी तारणासंबंधी आणखी सांगितले की, येशू नावात अर्थात त्याच्या अधिकाराने सार्वकालिक जीवन कसे प्राप्त होऊ शकते.

सर्व अधिकार असल्याचा दावा केल्यानंतर येशूने आपल्या शिष्यांना निर्देश दिले की, त्या अधिकाराला कसे मानायचे आहे.

''तेव्हा येशूजवळ येऊन त्यांच्याशी बोलतांना म्हणाला, स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करा. त्यास पित्याच्या, पुत्राच्या व पवित्र

आत्म्याच्या नावाने बाप्तिस्मा द्या. जे काही मी तुम्हाला आज्ञापिले ते सर्व त्यास पाळावयास शिकवा आणि पाहा युगाच्या समाप्तीपर्यंत मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे''(मत्तय २८:१८-२०).

''तेव्हा'' शब्द या वचनामध्ये पुढे येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला येशूच्या अधिकाराशी जोडतो, येथे मुख्य जोर शिष्य बनवण्यावर आहे. शिष्य बनविण्याचा तीन इतर क्रियांमध्ये अर्थात बाबींमध्ये स्पष्ट केल्या गेला आहे. जेणेकरून मुख्य क्रियेची माहिती मिळते. येशूच्या शिष्यांना जाऊन, पिता. पुत्र आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा देणे आणि सर्व गोष्टींना पाळावयास शिकवणे होते, ज्याची येशूने आज्ञा दिली होती. येशू ज्याच्याजवळ सर्व अधिकार आहे, त्याने त्यांना हे सर्व करायला सांगितले होते. शिष्य बनविण्याचा त्याचे प्रयत्न होते.

येशूचे अधिकार आणि तारणाच्या योजनेत हे संबंध नव्या करारातील इतर वचनामध्ये मिळतात. वधस्तंभावर दिल्या जाण्याच्या रात्री आपल्या शिष्यांना निरोपाच्या समयी शिक्षणात येशूने आव्हान केले होते की, परमेश्वराजवळ पोहचण्याचा एकमात्र मार्ग केवळ तोच आहे. ''येशूने त्याला म्हटले मार्ग, सत्य व जीवन मीच आहे. माझ्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही'' (योहान १४:६). पौलाने करिंथच्या लोकांना सांगितले होते की, तो आणि त्याच्याबरोबर काम करणारे लोक ख्रिस्ताचे वकील आहेत. ''म्हणून देव आम्हाकडून विनवीत असल्यासारखे आम्ही ख्रिस्ताच्या वतीने वकीली करितो, देवाबरोबर समेट केलेले असे तुम्ही व्हा, अशी आम्ही ख्रिस्ताच्या वतीने विनंती करितो'' (करिंथकरास दुसरे पत्र ५:२०). परमेश्वराला ग्रहण करून तारण पावण्याचा आग्रह करा. संभवता येशूच्या अधिकाराचे सर्वात संपूर्ण वाक्य प्रेषितांची कृत्ये ४ अध्यायामध्ये मिळते, जेथे पेत्राने एका लंगड्या मनुष्याला बरे केल्यावर येशूच्या शिक्षणाचे स्पष्टीकरण दिले होते.

''तेव्हा पेत्र पवित्र आत्म्याने पूर्ण होऊन त्यांना म्हणाला, अहो लोकाधिकाऱ्यांनो व वडील जणांनो एका दुर्बल मनुष्यावर कसा उपकार झाला म्हणजे तो कशाने बरा झाला याविषयी आमची आज चौकशी व्हावयाची असेल तर तुम्हा सर्वांना व इस्त्राएल लोकांना हे कळावे की, ज्याला तुम्ही वधस्तंभावर खिळून मारले ज्याला देवाने मेलेल्यातून उठविले, त्या नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने हा मनुष्य बरा होऊन तुमच्यापुढे उभा राहिला आहे. तुम्ही बांधकाम करणाऱ्यांनी तुच्छ मानलेला जो दगड कोनशिला झाला तो हाच आहे आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही, कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही'' (प्रेषितांची कृत्ये ४:८-१२).

पेत्र मंदिरामध्ये एका लंगड्या भिकाऱ्याला केवळ यासाठी बरे करू शकला पहा प्रेषितांची कृत्ये ३:१-१०. कारण येशूने त्याला असे करण्यासाठी अधिकृत केले होते आणि त्याला असे करण्यासाठी सामर्थ्य दिले होते. जी गोष्ट त्या चमत्कारासाठीही सत्य होती. तिच त्याच्यानंतर दिल्या जाणारी तारणाच्या शिक्षणासाठीही सत्य होती (प्रेषितांची कृत्ये ३:११-१६). नंतर प्रेषितांची कृत्ये ४:१-२२ चा वास्तविक आरोप पेत्राद्वारे केल्या जाणाऱ्या कामावर नाही; परंतु येशूच्या अधिकाराच्या विषयी होता. येथे आम्ही (मत्तय २८:१-२०) चा नियम लागू होणे पाहतो. प्रेषितांद्वारे ज्या तारणाचे आमंत्रण केल्या जात होते ते त्यांच्या स्वत:कडून दिल्या जाणारे अभिवचन नव्हते परंतु येशूच्या नावात अर्थात ख्रिस्ताच्या अधिकाराने दिल्या जाणारे अभिवचन होते.

प्रेषितांची कृत्यांमध्ये पेत्राने त्याच्या प्रवचनाला सकारात्मक रूपाने मानणाऱ्यांना सांगितले, ''पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापाची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येकजण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या'' (प्रेषितांची कृत्ये २:३८). प्रेषितांची कृत्ये तिसऱ्या अध्यायात

जेव्हा एका लंगड्या मनुष्याला बरे केले गेले होते. (जे प्रेषितांची कृत्ये चवथा आणि पाचवा अध्यायाच्या भांडणाचे कारण झाले.) तर पेत्राने त्याला म्हटले नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लागे'' (प्रेषितांची कृत्ये ३:६). पेत्र आणि योहान यांचा छळ करणाऱ्या यहुदी निरीक्षकांना या गोष्टीची माहिती होती की ते येशूच्या अधिकाराविषयी काय म्हणत आहेत. त्यांनी प्रेषितांना आदेश दिला की, ''मग त्यांनी त्यांना बोलावून असे निक्षून सांगितले की, येशूच्या नावाने अगदी बोलू नका अथवा शिकवूही नका'' (प्रेषितांची कृत्ये ४:१८, पहा ५:४०). या छळाच्या नंतर या समयानंतर जेव्हा शिष्य प्रार्थना करण्यास एकत्र झाले तर त्यांची प्रार्थना हीच होती की, तुझा पवित्र सेवक येशू याच्या नावाने चिन्हे व अद्‌भूते घडावी असेही कर (प्रेषितांची कृत्ये ४:३०).

नवजात मंडळी वाढून रोमी साम्राज्यात पसरल्या जावून येशूच्या अधिकाराचे आकर्षण सदोदीत राहिले. प्रेषितांची कृत्ये आठव्या अध्यायात फिलिप्पाद्वारे शोमरोनमध्ये सुवार्ता सांगितल्यानंतर त्याने तसेच म्हणजे प्रभू येशूच्या नावात बाप्तिस्मा घेण्यासाठी सांगून पेत्र आणि अन्य शिष्यासारखेच केले(प्रेषितांची कृत्ये ८:१६). प्रेषितांची कृत्ये नवव्या अध्यायामध्ये जेव्हा बर्णबा त्याला घेऊन प्रेषितांकडे आला आणि त्याला वाटेत प्रभूचे दर्शन कसे झाले प्रभू त्याच्याबरोबर कसा बोलला आणि येशूच्या नावाने दिमिष्कांत ''त्याने धैर्याने कसे भाषण केले हे सर्व त्याने त्यांना सांगितले'' (प्रेषितांची कृत्ये ९:२७).

प्रेषितांची कृत्ये दहा आणि अकरा या अध्यायामध्ये येशूच्या अधिकाराचा प्रश्न यापेक्षा महत्त्वपूर्ण झाला. जेव्हा पहिल्या वेळेस सुवार्ता ऐकणे आणि मानणारे लोक अन्यजातीचे होते. त्यांना तारणाचा आमंत्रण करण्याचा पेत्राला काय अधिकार होता? तो एक यहुदी होता आणि गैर यहुदीयांशी काहीच संबंध ठेवत नव्हता आणि ''ज्याने कधीच

अपवित्र वस्तू खाल्ली नव्हती.'' (प्रेषितांची कृत्ये १०:१४ पहा वचन २८). तो कर्नेल सारख्या अन्य जातीवाल्याशी कशी सहभागीता करू शकत होता? यरूशलेमच्या मंडळीच्या काही लोकांनी हे ऐकून की पेत्राने काय केले होते हाच प्रश्न केला. (प्रेषितांची कृत्ये ११:१-१८). याचे उत्तर प्रेषितांची कृत्ये १०:४४-४६ या वचनात मिळते. पवित्र आत्मा कर्नेल आणि त्याच्या घराण्यावर उतरला होता. ज्याकडून ते अन्य भाषा बोलू शकले. हे तसेच होते जसे प्रेषितांची कृत्ये याच्या दुसऱ्या अध्यायामध्ये प्रेषितांबरोबर झाले होते. हे पाहून पेत्राला समजले की, परमेश्वर अन्य जातीमध्ये काम करत आहे. या कारणाने कोणाला त्यांचा बाप्तिस्मा झाल्यावर त्यांना मंडळीत मिळवून घेण्यास थांबवायचे नव्हते. (वचन ४६,४७). यासाठी ''येशू ख्रिस्ताच्या नावात त्याचा बाप्तिस्मा व्हावा अशी त्याने आज्ञा केली तेव्हा काही दिवस राहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली'' (वचन ४८).

येशूच्या अधिकाराने पौल सुवार्तेला रोमी साम्राज्याच्या अन्य जाती जगापर्यंत घेऊन गेला. चमत्कार करत आणि लोकांना तारण मिळावे म्हणत फिलिप्पेमध्ये त्याने एका मुलीमधून भूताला हे म्हणत काढले की, ''येशू ख्रिस्ताच्या नावाने मी तुला आज्ञा करितो की, तू हिच्यामधून निघून जा, आणि तो तात्काळ निघून गेला''(प्रेषितांची कृत्ये६:१८). प्रेषितांची कृत्ये १९ व्या अध्यायात त्याला असे लोक ज्यांना योहानाच्या बाप्तिस्म्यामध्ये बुडविले होते, परंतु ख्रिस्ताच्या बाप्तिस्म्यामध्ये नाही आणि हे समजावल्यावर त्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला. (वचन ५ख.) करिंथ येथील मंडळीतील आढळणारी फुटीच्या समस्येला मिटवीत पौलाने तेथील बंधूना आठवण करून दिली की त्यांचा पौलाच्या नावात बाप्तिस्मा (करिंथकरास पहिले पत्र १:१३) झाला नव्हता. त्याने पुढे म्हटले तो या गोष्टीकडून आनंदित आहे की,

त्याने त्यांच्यामधल्या कित्येकांना बाप्तिस्मा दिला नाही. कारण त्याची अशी इच्छा नव्हती की, लोक म्हणतील त्यांना पौलाच्या नावात बाप्तिस्मा दिल्या गेला आहे. (करिंथकरास पहिले पत्र १:१३-१५). त्याची इच्छा होती पाठकाने या गोष्टीवर ध्यान द्यावे की, त्यांना येशूच्या नावात बाप्तिस्मा दिला गेला आहे. नंतर करिंथ येथील लोकांना लक्ष द्यायला सांगून त्यांना त्यांच्या जगातील पापपूर्ण स्थितीमधून काढल्या गेले आहे. आठवण दिली की येशूच्या अधिकाराला मानण्यासाठी त्यांनी काय केले होते. त्याने लिहिले, ''आणि तुम्हापैकी कित्येक तसे होते, तरी तुम्ही प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात धुतलेले, पवित्र केलेले व नीतिमान ठरविलेले असे झाला'' (करिंथकरास पहिले पत्र ६:११).

पौलाने स्पष्ट केले की, विश्वासू म्हणणाऱ्यांना येशूच्या नावाशिवाय कोणत्याही दुसऱ्या अधिकाराच्या खाली काम करण्याचा काही अधिकार नाही. जरी केफा (पेत्र) असो, अपुल्लोस असो किंवा पौल जरी असला तरीही (पहा) (करिंथकरास पहिले पत्र १:१०-१३). जर त्यांना त्या प्रसिद्ध लोकांच्या नावाला घेण्याची मनाई होती, तर आज लोक कोणत्या अधिकारांना मनुष्याचे नाव आपल्या नावासोबत जोडत आहेत?

सुरवातीचे ख्रिस्ती लोक येशूच्या अधिकाराविषयी गंभीररूपाने सावध होते. त्यांना येशूद्वारा या गोष्टी शिकवायला आज्ञा दिली होती. जी स्वर्गात बांधलेली आणि स्वर्गात मोकळी केली होती. (मत्तय १६:१९,१८:१८, २८:१९-२०) हे दाखविण्यासाठी ते जे काही म्हणत होते ते त्यांच्या स्वीकृतीशी होते आणि त्यांना आवश्यक सामर्थ्य दिल्या गेले होते (पहा इब्रीलोकास पत्र २:३,४) त्यांनी आपल्या नाही परंतु त्याच्याच अधिकाराने तारणाची घोषणा केली.

• • •



# तारण मिळण्यासाठी मी काय करू ?

- जे.सी.चोट

**को**णी जर जीवनामध्ये काही बनण्याची इच्छा धरेल किंवा नैतिक रूपामध्ये कितीही चांगला असेल परंतु तारण मिळण्यासाठी मी काय करू? या प्रश्नाचा सामना त्याला करावाच लागेल आणि या गोष्टीला मानावेच लागेल.

पौल म्हणतो की, ''मनुष्य पापी आहे. (रोमकरास पत्र ३:२३, ५:८) जोपर्यंत तो आपल्या मागील पापासाठी पश्चात्ताप करणार नाही तर त्याचे तारण होऊ शकत नाही. या कारणाने त्याला क्षमेच्या प्रभूच्या अटीला मानणे आवश्यक आहे. तारणाला प्राप्त करण्यासाठी परमेश्वराने आपल्या पुत्राला मरावयास पाठविले (योहान ३:१६,१७). येशूने आपले रक्त सांडले यासाठी की आपल्याला आपल्या पापापासून क्षमा मिळावी. (पौलाचे इफिसकरास पत्र १:७)

परंतु तारण मिळण्यासाठी मी काय करू ? काही केल्या जाऊ शकते काय? जर होय, तर काय ? या प्रश्नाचे उत्तर देण्याची रीत

प्रभूच्या शब्दांमध्ये आहे. येशूने म्हटले ''जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल.'' (मार्क १६:१६) पुन्हा येशूने म्हटले, ''आणि त्याने त्याला म्हटले असे लिहिले आहे की, ख्रिस्ताने दु:ख सोसावे, तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून उठावे'' (लूक २४:४६). येशूने पुढे म्हटले की, जर आपली इच्छा आहे की पित्यासमोर मला स्वीकारावे तर आपल्याला ही लोकांसमोर त्याला स्वीकारण्याची अत्यंत आवश्यकता आहे (मत्तय १०:३२).

या प्रश्नाचे उत्तर देण्याचा आणखी एक पद्धत आहे ती म्हणजे परमेश्वराची प्रेरणा प्राप्त झालेल्या लेखकांजवळ जाणे. पौलाने म्हटले ह्याप्रमाणे विश्वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्याद्वारे होते (रोमकरास पत्र १०:१७). इब्रीलोकास पत्राच्या लेखकाने (लेखक अज्ञात) घोषणा केली की ''आणि विश्वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे'' (इब्रीलोकास पत्र ११:६). नंतर पेत्राने घोषणा केली ''पश्चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल'' (प्रेषितांची कृत्ये २:३८). शौलाने हे विचारल्यावर की त्याने काय करावे, त्याला सांगण्यात आले की, तर ''आता उशीर का करतोस? ऊठ, त्याच्या नावाचा धावा करून बाप्तिस्मा घे आणि आपल्या पापाचे क्षालन कर'' (प्रेषितांची कृत्ये २२:१६).

प्रेषितांची कृत्ये २, ३, ८, ९, १६ आणि आणखी दिलेल्या प्रेषितांच्या अध्यायामध्ये आढळणाऱ्या अकरा मनपरिवर्तनाच्या घटनेवर लक्ष द्या. प्रत्येक घटनेमध्ये तुम्हाला आढळेल की सुवार्ता सांगण्यात आली आणि सुवार्ता सांगणाऱ्यांनी विश्वास धरला. आपल्या पापासाठी पश्चात्ताप केला. प्रभूमध्ये आपल्या विश्वासाचा स्वीकार केला आणि पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेतला.

तारणाच्या अटींना सोपे बनविण्यासाठी आणि आपल्याला सहज रूपामध्ये त्या समजण्यासाठी सहाय्य करायला आज्ञेच्या पायऱ्याबद्दल सांगितले आहे.

**पायरी १ - सुवार्ता ऐकणे, वचन ऐकणे.**

**२ - वचनावर सुवार्तेवर विश्वास ठेवणे.**

**३ - पश्चात्ताप करणे.**

**४ - येशूला देवाचा पूत्र म्हणून स्वीकार करणे.**

**५ - पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेणे.**

पुढे सविस्तर हे सांगितले आहे की या पायऱ्या मनुष्याला येशूमध्ये आणि त्याच्या मंडळीत ठेवतात, जेथे पापापासून त्याचे तारण होते (करिंथकरास पहिले पत्र १२:१३, कलस्सैकरास पत्र २:१४, गलतीकरास पत्र ३:२६,२७)

तारणाला समजण्यासाठी आणखी एक बाब म्हणजे नवीन जन्म किंवा आत्मिक जन्म दाखविला आहे. जे प्रभूची आज्ञा पाळण्याच्या वेळेस होते(योहान ३:३-५). जेव्हा सत्याला जे की परमेश्वराचे वचनाचे बी आहे, कोणाच्या हृदयात पेरल्याने, त्याला ग्रहण केल्या जाते, जे व्यक्तिला येशूमध्ये नवीन उत्पत्तीच्या रूपात पुढे येण्यासाठी पाण्यामध्ये डुबकी अर्थात बाप्तिस्म्याकडे घेऊन जातो. तर तो पाण्याने आणि आत्म्याने जन्म घेतो (योहान ४:५, रोमकरास पत्र ६:३,४ करिंथकरास दुसरे पत्र ५:१७).

पवित्रशास्त्र सांगते की, येशू वधस्तंभावर मरण पावला, कबरेमध्ये पुरल्या गेला आणि मरणातून तिसऱ्या दिवशी जिवंत झाला. करिंथकरास पहिले पत्र १५:१-४, रोमकरास पत्र ६:१७,१८ मध्ये पौल म्हणतो की, आपल्या पापासाठी मरून बाप्तिस्म्याच्या पाण्यामध्ये त्याच्याबरोबर पुरल्या

जाणे आणि नवीन जीवन जगण्यासाठी पाण्याच्या  कबरेमधून उठविल्या गेल्यावर आणि ते शिक्षण मान्य केल्यावर मग आम्ही त्याच्या वचनात एक पक्के होऊन जातो. प्रभूच्या आज्ञेला मानून आज्ञापालनाच्या कामामध्ये आपण म्हणू की, आम्ही येशूचा मृत्यू, गाडल्या जाणे आणि जिवंत होण्यावर विश्वास ठेवितो आणि सांकेतिक रूपात त्याचा मृत्यू, गाडल्या जाणे आणि जिवंत होण्यालाच दाखवत राहतो. रोमकरास पत्र ६ वा अध्याय ध्यानपूर्वक वाचावा.

तर मग कोणाचे तारण होऊ शकते ? जो समजण्याइतका मोठा आहे की, तो सत्य ऐकून समजू शकेल आणि पूर्ण मनाने याला मानून आपल्या पापापासून वळेल, लोकांसमोर येशूला परमेश्वराचा पुत्र मानुन आणि आपल्या पापाच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेईल, त्याचेच तारण होऊ शकते.

परंतु मग परमेश्वराची कृपा कोठे गेली ? पौल म्हणतो की कारण कृपेनेच विश्वासाच्याद्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही तर हे देवाचे दान आहे. (इफिसकरास पत्र २:८,९) याचा अर्थ आहे की तारण प्रभूने दिले आहे आणि आपल्या विश्वासाच्याद्वारे आमच्यासाठी आज्ञा पाळणे आवश्यक आहे, याद्वारे आमचे तारण होऊ शकेल. शेवटी आमचे तारण, जर खरोखरच आमचे होते तर ते देवाच्या कृपेनेच होते. कारण आपल्या चांगल्या कामाद्वारे तारण पावण्याच्या योग्यतेला कमवू शकत नाही. याबरोबरच आम्हाला स्मरण असायला पाहिजे की परमेश्वराची कृपा आम्हाला वाचवू शकत नाही, जर आपण त्याच्या आज्ञा पाळण्यासाठी मनाई करतो.

• • •



# धीराने धावा

**- जेरी बेट्स**

**ख्रि**स्ती जीवनात पुष्कळदा निराश होणे मोठी गोष्ट नाही. संसारिक सुखविलास, सामाजिक दबाव आणि शारीरिक छळ या कारणान आम्हाला वाटत की शस्त्रसामग्री टाकून द्यावी, परंतु आम्हाला हार पत्करायची नाही, कारण जर आपण हार मानतो तर आम्ही त्या सर्वांना ज्याच्यासाठी आपण कष्ट केले आहे ती हरवून टाकू. निराश होणे काही नवीन गोष्ट नाही. कारण एलिया आणि यिर्मया हे पवित्र शास्त्राचे मोठमोठे लोक पण निराश झाले होते.

निराश होणे आम्ही कसे थांबवू शकतो?इब्रीलोकस पत्र १२:१-२ मध्ये आपण वाचतो की, ''तर मग आपण एवढ्या मोठ्या साक्षीरूपी मेघाने वेढलेले आहोत म्हणून आपणही सर्व भार व सहज गुंतविणारे पाप टाकून आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरून धीराने धावावे; आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू ह्याच्याकडे पाहत असावे; जो आनंद त्याच्यापुढे होता त्याकरिता त्याने लज्जा तुच्छ मानून वधस्तंभ सहन केला आणि देवाच्या राजासनाच्या उजवीकडे बसला

आहे.

पहिले तर लेखक आम्हाला काही गोष्टींना दूर करण्यास सांगत आहे. आम्हाला पाप काढून टाकले पाहिजे. पाप आमच्या आजुबाजूला आहे आणि वाटते की, पुष्कळशा ख्रिस्ती लोकांसाठी याला दूर करणे कठीण काम आहे. आम्हाला ते ओझेपण उतरून ठेवण्याची आवश्यकता आहे जे आमची चाल हळू करते. आम्हाला त्या गोष्टींना दूर करण्याची गरज आहे. ज्या येशूवरून आमचे लक्ष हटविते.

दुसरे, आम्हाला धीराने धावले पाहिजे. लक्षात घ्या की लेखक ख्रिस्ती जीवनाला धावेबरोबर जोडत आहे. काही धाव फार लहान असते आणि त्यासाठी एकदम जोर लावायचा असतो आणि काही क्षणातच पूर्ण होते. काही धावेमध्ये खूप वेळपर्यंत कित्येक वेळेस तास न तासपर्यंत जोर लावावा लागतो. हे भावनात्मक किंवा क्षणिक आध्यात्मिक अनुभवापेक्षा फार मोठे आहे. हे सेवेने भरलेले जीवन आहे आणि यामध्ये ऊर्जा निरंतरेचे होणे आवश्यक आहे.

ख्रिस्ती धाव समाप्त होण्याच्या आधी सोडून दिल्याने आम्ही अनंत काळाची अपेक्षा करू शकत नाही. ''चांगले करण्याचा आपण कंटाळा करू नये. कारण आपण न खचलो तर यथाकाळी आपल्या पदरी पीक पडेल.'' (गलतीकरास पत्र ६:९). आधी इब्रीलोकास पत्र ६ व्या अध्ययात लेखकाने अब्राहामाची गोष्ट केली.'' त्याने धीर धरीला म्हणून त्याला अभिवचनानुसार लाभ झाला (इब्रीलोकास पत्र ६:१५). या प्रकारे पौलाने लिहिले आहे ''म्हणजे जे कोणी धीराने सत्कर्मे करीत राहून गौरव, सन्मान व अक्षयता ही मिळविण्याचा प्रयत्न करीतात त्यांना तो सार्वकालिक जीवन देईलच. (रोमकरास पत्र २:७)

तिसरे आम्हाला ''येशूकडे , ध्यान, लक्ष लावून पाहायला पाहिजे. ज्याप्रकारे मत्तय १४:३० मध्ये लाटांना पाहून जसे पेत्राचे लक्ष येशूवरून

हटल्या गेले होते, तसेच आमचे लक्ष येशूवरून हटवून दुसरीकडे लावताच आपण ख्रिस्ती धावेवरून मागे राहून जावू. येशू आमच्या विश्वासाचा कर्ता आणि सिद्ध करणारा आहे आणि आमची धाव पूर्ण करायला मदत करितो. 'ह्यामुळे ह्याच्याद्वारे देवाजवळ जाणाऱ्यांना पूर्णपणे तारावयास हा समर्थ आहे, कारण त्याच्यासाठी मध्यस्थी करण्यास हा सर्वदा जिवंत आहे. (इब्री लोकांस पत्र ७:२५)

येशूने ''त्या आनंदाला जो त्याच्यापुढे धरला होता'' पाहता पाहता आपली धाव पूर्ण केली. आम्ही परेशान होऊ शकतो की, वधस्तंभाकडे पाहून त्याला कोणता आनंद वाटला असेल? त्याने गेतशेमाने बागेत मनुष्याच्या भयानक पराजयाला उलटून टाकायच्या आनंदाला आणि सैतानाच्या पराजयाला पाहिले होते. त्याने (येशूने) आपल्या प्रिय जणांना म्हणजे तारण पावलेल्यांच्या आनंदाला आणि स्वर्गात जाणे पाहिले होते. अशा ''आनंदाची कल्पना करून येशूने वधस्तंभाचे दु:ख सहन केले ''म्हणजे त्याने शारीरिक पीडा आणि वधस्तंभाच्या कष्टाला सहन केले. हत्येचे जितके प्रकार मनुष्याने आजपर्यंत वापरले आहे वधस्तंभ त्यामध्ये सर्वात भयंकर आहे आणि येशूने आम्हाला वाचविण्यासाठी त्याला सहन केले.

याशिवाय येशूने ''लाजेची काहीच काळजी'' केली नाही, याचे कारण त्याची परवा, काळजी न करणे असे आहे.साधारणरित्या आपण वधस्तंभाच्या लाजेची गोष्ट करीत नाही. परंतु वधस्तंभावर खिळणे हे पण एक लाजीरवाणा प्रकार होता. वधस्तंभावर केवळ खतरनाक अपराध्यालाच चढविल्या जात होते आणि येणारे जाणारे लोक त्याकडे पाहून मरणाऱ्याची थट्टा करीत आणि त्यांची टिंगल करीत होते. येशूने त्या थट्टेला सहन केले. (मत्तय २७:२७-३१,३८-४४)

जसे येशूने त्या आनंदाला जो त्याच्या पुढे ठेवला होता, पहा

तसेच आम्हाला येशूला पाहायचे आहे आणि हे आवश्यक आहे. आमच्या मार्गात काहीही अडखळणे येवोत, आम्ही येशूकडे लक्ष द्यावे, कारण त्याने कितीतरी भयंकर दु:ख सहन केले होते. आम्हाला लक्ष देणे आवश्यक आहे. (इब्री लोकास पत्र १२:३) या वचनातील लक्ष देणे या ग्रीक शब्दाचा उपयोग नवीन करारात कोठेच झाला नाही.'' याचा अर्थ केवळ विचार करणे नाही परंतु दृढ बनून राहण्याचे रित शिकण्यासाठी येशूच्या दु:खाला आपल्या दु:खाबरोबर मिळविणे आहे. आपल्या प्रभूवर लक्ष देत राहणे आम्हाला हिम्मत हारून निराश होण्यापासून थांबवेल. आम्हाला केवळ वधस्तंभावरच नव्हे तर परंतु त्याच्या जीवनावर लक्ष देणे आवश्यक आहे की कशाप्रकारे त्याने सहन केले. विचार करा की येशू किती निराश झाला असेल. शेवटी त्याच्या स्वकियांनीच त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. सर्वात कमी विश्वास धरणारे त्याचे स्वत:चे शिष्यच होते. त्याने खूप मोठे दु:ख सहन केले आणि सर्वात मोठा सन्मान पावला.

आम्हाला थोडावेळ येणाऱ्या लाजेपेक्षा, वधस्तंभाद्वारे मिळणाऱ्या लाभावर अधिक विचार करायला पाहिजे. पौलाने याच गोष्टीवर जोर दिला, जेव्हा रोमकरास पत्र ८:१८ मध्ये त्याने लिहिले आहे, ''कारण आपल्यासाठी जे गौरव प्रगट होणार आहे त्याच्यापुढे सांप्रत काळाची दु:खे काहीच नाहीत असे मी मानतो''. जेव्हा आम्ही वधस्तंभापलीकडे पाहतो, जसे येशूने पाहिले होते तर आपण आपल्या जीवनात आपल्या धावेमध्ये फार सफल होऊ.

इब्रीलोकास पत्र १२:१-२ चे काही शब्द इब्री ख्रिस्ती लोकांना प्रोत्साहीत करण्यासाठी लिहिल्या गेले होते. जे येशूला सोडून देण्याच्या परीक्षेत होते. तेच शब्द आम्हाला निडर करतील. हिम्मत हारू नका.

• • •



# ह्याचा काय अर्थ आहे की स्त्री ''बालकाला जन्म देण्याच्या योगे तारण पावेल''

**- बेट्टी बर्टन चोट**

''**त**थापि मर्यादेने विश्वास, प्रिती व पवित्रता ह्यात त्या राहिल्यास बालकाला जन्म देण्याच्या योगे त्यांचे तारण होईल. (तिमथ्याला पहिले पत्र २:१५)

जेव्हाही आम्ही पवित्रशास्त्रामधून या वचनाला वाचतो तर आमचे लक्ष उत्पत्तीच्या तिसऱ्या अध्यायामध्ये वर्णिलेल्या एदेन बागेत आदाम आणि हव्वा यांनी केलेल्या पापाकडे जाते. परमेश्वराने हव्वेच्या केलेल्या कारणाने जेव्हा तिला शाप दिला आणि म्हटले होते की, ''मी तुझे दु:ख व तुझे गर्भधारण बहुगुणित करीन, तू क्लेशाने लेकरे प्रसवशील'' त्याने हे पण म्हटले की, स्त्री व सर्प यामध्ये म्हणजे सर्पाची संतान आणि स्त्रीची संतान यामध्ये वैर स्थापिन. ''आणि तू व स्त्री तुझी संतती व तिची संतती यामध्ये मी परस्पर वैर स्थापिन. ती तुझे डोके फोडील व तू तिची टाच फोडशील'' (उत्पत्ती ३:१५). याकडून येणारा तारणारा,

ज्याला स्त्रीद्वारे जन्म घ्यायचा होता ही पहिली भविष्यवाणी मानल्या जाते.

ज्या स्त्रीच्या आज्ञा मोडल्याच्या कारणाने पाप आणि मृत्यू जगात आले होते त्याच्याद्वारे पापाचा इलाज कुमारी मरियेद्वारा येशू ख्रिस्ताच्या जन्माच्याद्वारे होणार होता. या प्रकारे बालकाला जन्म देणे मनुष्य जातीला आज्ञा मानण्यासाठी तारणाचा मार्ग बनल्या जाणे होता.

परंतु या सोबतच लेकरे प्रसवल्याद्वारे तारण पावण्याचे दोन अर्थ आहे पहिला म्हणजे ती परमेश्वराची विश्वासू बनून राहील.

परमेश्वराने जेथे आदामाला अर्थातच पुरुषाला कुटुंबाची भौतिक आवश्यकता पूर्ण करण्याची जबाबदारी दिली तसेच स्त्रीला घर कुटुंबाची आणि लहान लेकरांची जबाबदारी सोपवली तिमथ्याला पहिले पत्र ५:१४ मध्ये स्त्रीला लग्न करणे, मुले प्रसवावी, घर चालवण्याची जबाबदारी दिलेली आहे. वृद्ध स्त्रियांना सांगण्यात आले आहे.'' त्यांनी तरूण स्तियांना असे शिक्षण द्यावे की त्यांनी आपल्या नवऱ्यावर व मुलाबाळांवर प्रेम करावे त्यांनी मर्यादशील, शुद्धाचरणी, घरचे काम पाहणाऱ्या, मायाळू आपआपल्या नवऱ्याच्या अधीन राहणाऱ्या, असे असावे. म्हणजे देवाच्या वचनाची निंदा होणार नाही.

परमेश्वराद्वारा दिलेल्या या कार्याला पूर्ण करूनच स्त्री त्याच्या आज्ञेला इमानदारीने पाळून परमेश्वराला स्वीकार्य होवू शकते. कुटुंबाचा आणि लेकरांचा सांभाळ करणाऱ्या आज्ञेला कोणत्याही प्रकारे स्वत:च्या इच्छेने पूर्ण केल्या जाऊ शकत नाही. कारण हा स्त्रीच्या मुक्तीच्या योजनेचा एक भाग आहे. याप्रकारे स्त्री लेकरे प्रसवण्याद्वारे तारण पावेल. जर ती विश्वासात बनून राहील, स्थिर राहील.

स्त्रीचे लेकरे प्रसवण्याच्याद्वारे तारण पावण्याचा दुसरा अर्थ

आहे की तान्ह्या बाळांचे पालन-पोषण करण्याच्या काळामध्ये तिच्या आपल्या आत्मिक जीवनामध्ये पुष्कळ प्रकारचे अडखळण आणि समस्या येतील. आपल्या लेकरांना उपासनेला घेऊन जाणाऱ्या स्त्रीला त्यांच्या आवश्यकतेची, त्यांची ओरडण्याची, आवाज करण्याची आणि त्यांच्या भूकेची समज असते ती जेव्हाही उपासना करेल तेव्हा अडथळा बाधा येईलच. याप्रकारे पवित्र लोकांच्या सोबत आराधना, उपासना करण्यासाठी जातांना तिचे जीवनाचे कित्येक वर्ष निघून जाऊ शकतात. ज्यामध्ये तिला हेही लक्षात राहत नाही की उपासनेमध्ये काय काय झाले होते.

घरामध्येच, तिला आपल्या लेकरांच्या ओरडण्याने आणि त्यांच्या आवश्यकतेच्या कारणाने रोज पवित्रशास्त्र वाचणे, प्रार्थना करणे यासाठी वेळ काढणे कठीण होऊ शकते. जेव्हा तिला वाटते की तिचा आत्मा संतुष्ट झाला नाही, तेव्हा निस्वार्थ होण्याच्या या प्रतिक्रियेतून जात असता, आपल्या हृदयात परमेश्वराला आणि त्याच्या वचनाला ठेवत शिकू शकते.

परमेश्वराला माहीत होते की, लहान तान्ह्या लेकराची परिस्थिती आणि त्याची आवश्यकता काय असेल? त्याने या आवश्यकतेला पूर्ण करण्यासाठी स्त्रीला, परमेश्वराच्या सृष्टीला कोमलता, धीर, कोमल हृदय, अनुभवी मन, अतुट प्रेम करण्याचे अनेक गुण दिले आहे. या सर्व गोष्टी त्यापर्यंत पुरुष पोहचू शकत नाही. एका आईसाठी आपल्या लेकरांचे पालनपोषण करणे, रोज परमेश्वराने दिलेल्या गुणामध्ये वाढणे आणि आपल्या लेकरांबरोबर आणखी प्रेम, धीराने आणि मोठ्या समजदारीने व्यवहार करायला शिकणे आवश्यक आहे. असे केल्याने परमेश्वराद्वारे तिला दिल्या गेलेल्या कार्याला पूर्ण करून ती आपल्या जीवनाला समृद्ध तसेच भक्तिपूर्ण बनविते.


परंतु कठीण समस्यामध्ये तिला विश्वासू बनून राहणे आवश्यक आहे. अडखळणाशिवाय उपासनेच्या कमी वेळेव्यतिरिक्त अध्ययनासाठी वेळ काढून परमेश्वराच्या वचनाने आपली आत्मिक भूक मिटविण्याशिवाय या सत्याशिवाय त्या वर्षामध्ये तिला परमेश्वरासोबत आपले व्यक्तिगत संबंध पूर्ण मनाने बनून ठेवणे आवश्यक आहे. मातृत्वाच्या पुष्कळशा आव्हानांचा सामना करते वेळी तिला शिकणे आवश्यक आहे.

- परमेश्वरामध्ये खोलवर विश्वास.
- त्याच्या सांभाळण्यावर आणि निर्भरतेवर.
- त्याच्यासाठी जिवंत प्रेम.
- आणखी अधिक पवित्रता.
- आणि निश्चयच आत्मसंयमाच्या अनुशासनाला व्यवहारामध्ये आणण्याचा पर्याय प्राप्त होईल.

तिच्यामध्ये हे गुण असणे आवश्यक आहेत. कारण जर तिचाच संबंध आपल्या परमेश्वराबरोबर नाही तर ती आपल्या लेकरांना कसे शिकवू शकते? की त्यांनी परमेश्वरावर भरोसा ठेवावा. परंतु लेकरांची आत्मिक मार्गदर्शन करत आपल्या उन्नतीचा प्रयत्न करत ती एक अशी आत्मिक व्यक्ती बनून जाईल ज्या जीवनाच्या सर्व आव्हानांचा सामना परमेश्वरासमोर समर्पण आणि त्याच्यावरील विश्वासाने करू शकते.

''तथापि मर्यादेने विश्वास, प्रिती व पवित्रता ह्यात त्या राहिल्यास बालकाला जन्म देण्याच्या योगे त्यांचे तारण होईल.''

• • •



# पवित्रशास्त्र वाचणे आणि समजून घेण्यासाठी काही विचार

**- चार्ल्स स्कॉट**

**प**वित्र शास्त्राला समजणे आणि त्यामधून पुष्कळसा लाभ उचलण्यासाठी काही नियमाचे पालन करणे आवश्यक आहे. त्यामधून काही नियम याप्रकारे आहेत.


पहिले तर आपल्या मनाला तयार करा की, तुम्ही परमेश्वराच्या वचनातून वाचणार आहात. यासाठी आपले ज्ञान, अहंकाराला काढून लेखकाच्या मनात डोकावणे आवश्यक आहे. उदाहरणासाठी जेव्हा प्रभू येशूने हेरोदास खोकड म्हटले, ''त्याने त्याला म्हटले, त्या खोकडाला जाऊन सांगा,पहा, मी आज व उद्या भूते काढतो व रोग बरे करितो'' (लूक १३:३२). आणि आपल्या शिष्यांना म्हटले, तुम्ही पृथ्वीचे मीठ आहा. म्हटले तर या अर्थात समजणे चुकीचे आहे, कारण हेरोद खोकड नव्हता आणि शिष्य मीठ नव्हते. परंतु याला यांच्या सांकेतिक प्रकारे

वापरण्यात आले आहे आणि याला याच अर्थाच्या अनुसार न समजून त्याचे प्रतिक समजायला पाहिजे. प्रगटीकरण या पुस्तकात पुष्कळशा चिन्हांचा वापर केला गेला आहे. प्रत्येक देशाच्या साहित्यामध्ये असे सांकेतिक आणि प्रतिक यांचा वापर केल्या जात आहे, यासाठी पवित्र शास्त्रामध्ये या प्रतिकाचा उपयोग काही नवीन गोष्ट नाही.

आम्हा सर्वांसोबत महत्त्वपूर्ण गोष्ट ही आहे की वचनामध्ये परमेश्वर आमच्याच भाषेमध्ये आमच्याशी बोलतो. त्याच्यावर विश्वास ठेवून पवित्रशास्त्र वाचले तर तो तुम्हाला त्याचे ज्ञान आणि समज देईल, तुमच्याबरोबर बोलेल यासाठी की तुम्ही त्याचे ऐकावे आणि त्याला मानावे.

• • •

फिलीपै ३: १३-१४ मध्ये तो म्हणतो की, ''बंधूजनहो, मी अद्यापि ते आपल्या कह्यांत आणले असे मानीत नाही, तर मागील गोष्टीकडे दुर्लक्ष करून व पुढील गोष्टींकडे लक्ष लावून, ख्रिस्त येशूमध्ये देवाचे जे वरील पाचारण त्यासंबंधीचा पण जिंकण्यासाठी मर्यादेवरील खुणेकडे धावतो, हेच एक माझे काम आहे.''



# मंडळीचे महत्त्व

**- विलियम वुडसन**

**ए**खाद्या विशेष गतिविधीमध्ये काहींची दुर्गति आणि भागीदारी सहज रितीने त्या गतिविधीशी जुळलेल्या महत्त्वाच्या अनुसार असते. जबरदस्ती येथपर्यंत की घरच्या कामामध्ये भागीदारीने माहिती होते की ते काम किती महत्त्वपूर्ण आहे. ही गोष्ट विशेष रूपात मंडळीवर लागू होते. उपासनेमध्ये भाग घेण्यासाठी कौटुंबिक शक्ती जबरदस्ती करत नाहीत. कारण यामध्ये काही वित्तीय प्रोत्साहन पण नाही. मंडळीमध्ये उत्साह आणि भागीदारीने माहीती होते की कोणासाठी ह्याचं काय महत्त्व आहे.

आपले जीवन आणि सेवेसोबत मंडळीच्या महत्त्वाला कसे ठरविल्या जाईल? कृपा करून लक्ष द्या की पवित्र शास्त्राने मंडळीला काय महत्त्व दिले होते किंवा आहे.

मंडळी परमेश्वरासाठी महत्त्वपूर्ण होती. ''यासाठी की, जो

युगादिकालाचा संकल्प त्याने आपल्या प्रभू ख्रिस्त येशूमध्ये सिद्धीस नेला आहे. त्याप्रमाणे देवाचे नानाविध ज्ञान स्वर्गातील अधिपती व अधिकारी यांना मंडळीच्याद्वारे आता कळावे'' (इफिसकरास पत्र ३:११). हा वादा संदेष्टे आणि येशूच्या सेवाकार्यात पूर्ण रूपात प्रगट केला गेला आहे. मंडळी परमेश्वराचीच तशीच आहे कारण त्यानेच तिची योजना बनविली आहे.

मंडळी येशूसाठी महत्त्वपूर्ण होती. तो मरण पावला यासाठी की मंडळी अस्तित्वात यावी. मंडळीला त्याच्या रक्ताने स्वत:करिता मिळविली. (विकत घेतली  होती). (प्रेषितांची कृत्ये २०:२८), इफिसकरास पत्र ५:२५,२६ ''तोच शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे. (कलस्सैकरास पत्र १:१८) (इफिकरास पत्र १:२२). ''कारण एकच देव आहे आणि देव व मानव यामध्ये ख्रिस्त येशू हा मनुष्य एकच मध्यस्थ आहे. (तिमथ्याला पहिले पत्र २:५, एफिसकरास पत्र २:१६). तो या जगातील प्रत्येक वस्तूंचा अंत होईपर्यंत मंडळीवर राज्य करेल. (करिंथकरास पहिले पत्र १५:२४-२८). आमच्या प्रभू येशू ख्रिस्तासाठी मंडळी सर्वात महत्त्वपूर्ण अशी आहे.

परमेश्वराच्या लोकांसाठी मंडळी महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा देवाशी समेट केला गेला आहे. (इफिसकरास पत्र २:१६). ते जिवंत आणि सत्य परमेश्वराची सेवा करतात आणि त्याचा पूत्र येशू ह्याची स्वर्गातून येण्याची वाट पाहतात. (थेस्सलनीकाकरास पहिले पत्र १:९-१०). मंडळीमध्ये पक्की आशा ख्रिस्तात आढळते. (पेत्राचे पहिले पत्र १:३). मंडळीमध्ये परमेश्वराच्या स्वरूपात वाढण्यासाठी लक्षात घ्या की, प्रभू येशूच्या विचारात आणि कार्यात मंडळीला अधिक महत्त्व आहे. ह्यामध्ये आपण भाग घेणे महत्त्वाचे आहे.

● ● ●



# एकतेसाठी एक विनंती

**- जे.सी.चोट**

**ख्रि**स्ताची मंडळी भारतात आज लहान प्रमाणात आहे. जगाच्या कित्येक भागामध्ये ख्रिस्ताची मंडळी विद्यमान आहे. सुरूवातीला मंडळीची स्थापना येरूशलेममध्ये झाली होती. (प्रेषितांची कृत्ये दुसरा अध्याय). परंतु वास्तविकता ही आहेकी, आताच काही वर्षापूर्वी आमच्या आधुनिक युगामध्ये, सत्यामध्ये असलेल्या मंडळीविषयी लोकांना माहिती होत आहे. मंडळी कोठवर विद्यमान राहील, हे या गोष्टीवर अवलंबून राहते की, या मंडळीचे सदस्य किती विश्वासाच्या योग्य आहेत. तसेच सुवार्तेचा प्रचार-प्रसार किती केला जातो? विश्वासू बनून राहण्यासाठी पवित्र शास्त्राचे अध्ययन करणे तसेच शिक्षणात बनून राहणे फार आवश्यक आहे.

कित्येक लोक आले आणि त्यांनी ख्रिस्ताच्या मंडळीच्याविषयी लोकांना सांगितले. दक्षिण भारतामध्ये ख्रिस्ताच्या मंडळीचा फार प्रचार झाला आहे आणि तेथील लोकांनी सुवार्तेच्या प्रति खूप उत्साह दाखविला

आहे आणि आज तेथे ख्रिस्ताच्या मंडळ्या खूप जास्त प्रमाणात आढळतात.

आज आमच्या जगात ख्रिस्तीपणा वाटल्या गेला आहे. लोक विभिन्न प्रकारच्या शिक्षणाकडे जात आहे. प्रचारक लोक असे शिक्षण देत आहेत ज्याच्याविषयी आम्हाला पवित्र शास्त्रात वाचायला मिळत नाही. परमेश्वरही या सर्वांकडून प्रसन्न होत नाही. आज लोक ख्रिस्ताला विभागलेल्या रूपात पाहतात.आपण जर पाहणी केली तर जगामध्ये खूप सारे पंथ आहेत आणि त्यांची संख्या कित्येक हजारामध्ये आहे. सर्व म्हणतात की आमचे शिक्षण बरोबर आहे. परंतु येशूने म्हटले होते ''मला प्रभूजी प्रभूजी असे म्हणणाऱ्या प्रत्येकांचा प्रवेश स्वर्गाच्या राज्यात होईल'' असे नाही तर जो माझ्या स्वर्गीय पित्याच्या इच्छेप्रमाणे वागतो त्याचा होईल.(मत्तय ७:२१).

तुम्ही प्रभूच्या इच्छेप्रमाणे चालत आहात काय? जर सर्व प्रभूच्या इच्छे अनुसार चालता तर जगामध्ये ख्रिस्तीपणामध्ये एकता होईल. आज सर्व येशूमध्ये विश्वास करणाऱ्यांना पवित्र शास्त्रांकडे वळून, एका व्यासपीठावर यायला पाहिजे.

जर तुम्ही एका नव्या करारा नियमानुसार ख्रिस्ती आहात तर तुम्हाला नवीन कराराच्या मंडळीविषयी दुसऱ्यांना सांगितले पाहिजे. या ख्रिस्ती धर्माबद्दल आम्ही पवित्र शास्त्रात वाचतो. तुम्ही सुशिक्षित आहात किंवा असुशिक्षित, तुम्हाला हा प्रयत्न केला पाहिजे की तुम्ही सत्याच्या मंडळीबद्दल दुसऱ्यांना सांगितले पाहिजे. ख्रिस्ताच्या मंडळीच्या सभासदाचा उद्देश हा आहे की त्यांनी सुवार्ता प्रसार करावा.

पवित्र शास्त्रात आपण त्या ख्रिस्ती लोकांबद्दल वाचतो जे करिंथ येथे राहत होते. ते प्रभूचे लोक होते. त्याच्या मंडळीत ते होते. परंतु आपसात त्यांची फूट पडली होती. आता पहा पौल त्यांना काय

म्हणतो, ''बंधूजनहो, आपला प्रभू येशू ह्याच्या नावाने मी तुम्हास विनंती करितो की तुम्हा सर्वांचे बोलणे सारखे असावे. म्हणजे तुमच्यामध्ये फूटी पडू नयेत. तुम्ही एकचित्ताने व एकमताने जोडलेले व्हावे.कारण माझ्या बंधुंना तुमच्यामध्ये कलह आहेत असे मला ख्लोवेच्या माणसाकडून कळले आहे. माझे म्हणणे असे आहे की, तुमच्यापैकी प्रत्येकजण मी पौलाचा,मी अपुल्लोसाचा, की केफाचा आणि मी ख्रिस्ताचा आहे असे म्हणतो. ख्रिस्ताचे असे विभाग झाले आहेत काय''? पौलाला तुम्हासाठी वधस्तंभावर खिळले होते काय? पौलाच्या नावात तुमचा बाप्तिस्मा झाला होता काय?(करिंथकरास पहिले पत्र १:१०-१३). प्रेषित पौलाने त्यांना या गोष्टीसाठी दटावले होते की आपसात त्यांची फूट पडली होती ते चूक करत आहेत.आज जर पौल ह्या जगात असता तर फूट पडलेले ख्रिस्तीत्व पाहून त्याला किती दु:ख झाले असते?


आम्ही पुढे वाचतो जेव्हा पौलाने ख्रिस्ती लोकांना विश्वासणाऱ्यांना म्हटले होते, ''आता बंधुजनहो मी तुम्हाला विनंती करितो की, तुम्हाला जे शिक्षण मिळाले आहे त्याविरुद्ध जे फूटी व अडथळे घडवून आणीत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि त्यांच्यापासून दूर व्हा. कारण तसले लोक आपल्या प्रभू ख्रिस्ताची सेवा करीत नाहीत तर स्वत:च्या पोटाची सेवा करितात आणि गोड व लाघवी भाषणाने भोळ्याच्या अंत:करणास भुलवितात'' (रोमकरास पत्र १६:१७-१८). प्रेषित पौलाने हे पण म्हटले होते की, त्यांच्या जाण्याच्या पश्चात फाडणारे लांडगे त्यांच्यामध्ये शिरतील आणि कळप किंवा मंडळीला सोडणार नाही. पौल म्हणतो,''तुम्ही स्वत:कडे व ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हास अध्यक्ष करून ठेवले त्या सर्वांकडे लक्ष द्या. ह्यासाठी की, देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वत:करिता मिळविली तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे. तुम्हापैकीही काही माणसे

उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील'' (प्रेषितांची कृत्ये २०:२८-३०).

येशूने आपल्या लोकांच्या एकतेसाठी प्रार्थना केली होती. (योहान १७:२१). धार्मिक जगामध्ये फूट आहे. ज्याचा आपण नेहमी विरोध करतो. आज जगामध्ये ख्रिस्तीत्व विभिन्न तुकड्यामध्ये वाटलेली आहे. जर सर्व विश्वास ठेवणारे पवित्र शास्त्राच्यानुसार येतील तर एकता संभव होऊ शकते. (इफिसकरास पत्र ४:४-६). प्रभूच्या मंडळीतही सभासदांना आपले ध्यान ठेवले पाहिजे यासाठी की मंडळीत कोणत्याही प्रकारची फूट नसावी. फुटीमुळे मंडळीला नुकसान होते आणि तो दुसऱ्या समोर एक वाईट उदाहरण होते. आज वेळेचा आवाज हा आहे की लोक सत्य नवीन ख्रिस्तीत्वाकडे परत येतील.

• • •

| | |
|---|---|
| देवाची मंडळी | - प्रेषित २० : २८, २ करिंथ १:१ |
| ख्रिस्तांचे शरीर | - कलस्सै १ : १८, २४ |
| | इफिस १ : २२ - २३ |
| ख्रिस्ताचे राज्य | - कलस्सै १ : १३ |
| ज्येष्ठांचा समाज व मंडळी | - इब्री १२ : २३ |



# खोटे शिक्षक

- वेयन बैरियर

पवित्र शास्त्र खोटया शिक्षकांचे ऐकण्याविषयी पुष्कळशा धोक्यांबद्दल मार्गदर्शन करते. त्यावेळी पौलाने खोटे शिक्षण देणाऱ्याबद्दल इफिसच्या प्राचीनांना समजावले होते.

''तुम्ही स्वत:कडे व ज्या कळपात पवित्र आत्म्याने तुम्हास अध्यक्ष करून ठेवले त्या सर्वांकडे लक्ष द्या. ह्यासाठी की देवाने जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वत:करिता मिळविली तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील हे मी जाणून आहे. तुम्हापैकी काही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील'' (प्रेषितांची कृत्ये २०:२८-३०).

कळपातूनच खोटया शिक्षकाचे निघणे, पहिल्या शतकाची समस्या होती आणि आजही समस्या आहे. ते आपली सेवा करणारे, उंच पदाला चाहणारे, धोका देणारे आणि सैतानाचे कुशल कारागीर आहेत. आज ते काही मूलभूत शिक्षणाला जे भावांना मानण्यासाठी

कठीण वाटते. नवीन मंडळीमध्ये कित्येक विनाश आणि विघटन टाकण्याचे कारण बनतात. हे दाखवण्यासाठी की पवित्र शास्त्राचे स्पष्टीकरण करण्याची समज त्यांच्यामध्ये अधिक आहे. ते पवित्र शास्त्राची व्याख्या नवीन नवीन पद्धतीने करतात.

प्रेषित पेत्रानेही पहिल्याच शतकातील खोट्या शिक्षकाविषयी सावधान केले होते. ''तर आपल्या लोकातही खोटे संदेष्टे होते तसे तुम्हातही खोटे शिक्षक होतील. ते विध्वसंक, पाखंडी मते गुप्तपणे प्रचारात आणतील. ज्या स्वामीने त्यांना विकत घेतले त्यालाही ते नाकारतील आणि आपणावर आकस्मित नाश ओढून घेतील. त्यांच्या कामातूर आचरणाचे अनुकरण पुष्कळ लोक करितील. त्यांच्यामुळे सत्यमार्गाची निंदा होईल. ते लोभ धरून बनावट गोष्टी सांगतील आणि तुम्हावर पैसे मिळवितील, त्यांच्याकरिता नेमलेला दंड पहिल्यापासूनच विलंब करीत नाही आणि त्यांचा नाश डुलक्या घेत नाही'' (पेत्राचे दुसरे पत्र २:१-३).

''ते निर्जल झरे, वादळाने उडविलेले धुके असे आहेत, त्याच्यासाठी धनंधकाराची काळोखी राखलेली आहे. भ्रमात असणाऱ्या लोकातून कोणी बाहेर पडले न पडले ते लोक त्यांना व्यर्थपणाच्या फुगीर गोष्टी सांगतात व दैहिक वासनांधीन करून त्यांना कामातुरपणाचे मोह घालितात. ते त्यांना स्वतंत्रतेचे वचन देतात आणि स्वत:तर भ्रष्टतेचे दास आहेत. कारण मनुष्य ज्याच्या कह्यात जातो त्याचा तो दासही बनतो''(पेत्राचे दुसरे पत्र २:१७-१९).

खोटा शिक्षक त्या ख्रिस्ती लोकांना जे सत्याने पवित्र शास्त्राचे अध्ययन न करणाऱ्यांच्या मागे सहज लागू शकतो. ते दिसण्यात फार प्रभावशाली आणि मजबूत दिसतात. त्यांना पुष्कळसे ज्ञान आणि विशेष समज असतो.

आम्हाला खोट्या शिक्षकाला ओळखण्यासाठी सावधान

असायला पाहिजे आणि त्याची आवश्यकता आहे. जर आपण त्यांना ओळखू शकत नाही तर आम्ही आणि दुसरे लोक नाश पावू. पेत्राने खोटे शिक्षक आणि त्यांचे शिक्षण मानणाऱ्याच्या स्थितीचे वर्णन केले आहे.

''कारण नितीमत्वाचा मार्ग समजून आल्यानंतर आपणास दिलेल्या पवित्र आज्ञेकडे पाठ फिरवणे ह्यापेक्षा तो न समजणे ते त्यांच्यासाठी बरे होते'' (पेत्राचे दुसरे पत्र २:२१).

• • •

आज मनुष्य सर्वात मोठी एक चूक करीत आहे, ती म्हणजे तो पदव्या आणि व्यापार यामध्ये यशाचे गमक, खरे यश मानतो. प्रसन्नता आणि आनंद प्राप्तीसाठी विविध आधुनिक विजेवर चालणाऱ्या उपकरणांचा आणि यंत्राचा तो एक प्रकारे साठाच आपल्या स्वत:जवळ करीत आहे. मादक द्रव्यांमध्ये मनुष्य मन:शांती शोधण्याचा प्रयत्न करत आहे.

# तुम्ही येशूबरोबर काय कराल ?

**- सनी डेविड**

**या** आपण या धड्याची सुरूवात लूक १९ या अध्यायामध्ये मिळणाऱ्या घटनेशी करत आहोत. ज्यामध्ये आपण जक्कय नावाच्या व्यक्तिविषयी वाचतो. या आधी आपण अध्याय १८ मध्ये वाचतो की येशूने आपल्या शिष्यांना घेऊन येरूशलेमेला जाण्याची योजना बनविली होती आणि जेव्हा तो जात होता तर मार्गामध्ये त्याने एका आंधळ्याला दृष्टिदान दिले होते. ह्या परिणामामुळे अनेक त्याकडे आकर्षित झाले. आम्ही नंतर आपण वाचतो, की ''त्याने यरीहोत प्रवेश केला व त्यातून तो पुढे जात होता तेव्हा पहा जक्कय नावाचा कोणी एक मनुष्य होता. तो मुख्य जकातदार असून श्रीमंत होता. येशू कोण आहे हे पाहण्यासाठी तो प्रयत्न करीत होता पण गर्दीमुळे त्याचे काही चालेना. कारण तो ठेंगणा होता. तेव्हा तो पुढे धावत जाऊन त्याला पाहण्यासाठी उंबराच्या झाडावर चढला. कारण येशूला त्या वाटेने जावयाचे होते. मग येशू त्या ठिकाणी येताच दृष्टीवर करून त्याला म्हणाला, जक्कया त्वरा करून खाली ये. कारण आज मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे. तेव्हा त्याने त्वरेने खाली उतरून आनंदाने त्याचे आगतस्वागत केले. हे पाहून सर्व लोक कुरकूर करू लागले की, पापी मनुष्याच्या घरी हा उतरावयास गेला आहे. तेव्हा जक्कय उभा राहून प्रभूला म्हणाला प्रभुजी, पहा मी आपले अर्धे द्रव्य दरिद्र्यास देतो आणि मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करितो. येशूने त्याला म्हटले आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे. कारण हाही अब्राहामाचा पुत्र आहे. कारण मनुष्याचा पुत्र 'हरवलेले शोधावयास' व 'तारावयास' आला आहे'' (लूक १९:१-१०).

आम्ही पाहता की जक्कय जकात घेणाऱ्यांचा मुख्य होता. रोमी

साम्राज्यात जकात घेणाऱ्या लोकांना फारच घृणास्पद दृष्टीने पाहिल्या जात होते. कारण जकात घेणारे लोक नेहमी कित्येक प्रकारच्या अनुचित प्रकारे लोकांकडून अधिक जकात कर, वसूल करीत होते. हेच कारण आहे की जेव्हा येशू त्याच्या घरात गेला तर लोकांना हे म्हणून त्याला बरेवाईट म्हटले की तो तर पापी मनुष्याच्या घरात गेला आहे.

जक्कय एक श्रीमंत व्यक्ती होता परंतु तो आपल्या त्या अपरंपार धनाच्या जोरावर तारण प्राप्त करू शकला असता काय ? निसंदेह तो स्वत:च्या आणि जगाच्या दृष्टीमध्ये एक श्रीमंत मनुष्य होता. त्याच्याजवळ जगाची प्रत्येक वस्तू होती, परंतु आत्मिक दृष्टिकोनातून निर्धन होता म्हणजे तो या जगात अन्य लोकांसारखा हरवलेला होता. त्याला तारणाची गरज होती आणि येशूला ही गोष्ट माहीत होती. यासाठी जेव्हा त्याने पाहिले की, जक्कयच्या मनात त्याला भेटण्याची इच्छा आहे तर प्रभूने स्वत: त्याच्या घरी जाण्याची इच्छा व्यक्त केली. त्याला माहीत होते की जक्कय त्याचा स्वीकार करू इच्छितो, त्याला माहीत होते की जक्कय त्याच्यावर विश्वास ठेवतो. म्हणून त्याने त्याला म्हटले, कारण आज मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे.

जक्कयाने प्रभू येशूबद्दल फार खूप ऐकले होते. त्याने त्याच्या अनेक महत्त्वपूर्ण शिक्षणाविषयी ऐकले होते. त्याने पुष्कळशा आश्चर्यजनक कामाविषयी ऐकेले होते. तो येशूला भेटायला फार उत्सुक होता. लिहिले आहे की, येशूला पाहू इच्छित होता म्हणून तो येशूला भेटण्यासाठी रस्त्यात एका ठिकाणी उभा राहिला. परंतु काही वेळाने त्याने पाहिले की, खूप मोठी गर्दी येशूला घेऊन येत आहे. आता तो काय करेल ? तो निराश होऊन आपल्या घरी परत जाईल? किंवा तो आपल्या मनात म्हणेल की कधीतरी नंतर चांगली वेळ पाहून येशूला भेटेन ?

मित्रांनो, जक्कय पक्क्या निश्चयाने आला होता. त्याने त्याच्या मनात निश्चय केला होता की आज तो येशूला पाहूनच घरी जाईल.

म्हणून आपण पाहतो की, तेव्हा त्याला पाहायला तो पुढे धावत जावून उंबराच्या झाडावर चढला. ठेंगणा होता परंतु त्याने हिंमत सोडली नाही. त्याने पाहिले की खूप मोठी गर्दी येशूला घेरून आहे. परंतु याकडून त्याचं हृदय लहान झाले नाही. त्याला आज येशूला भेटण्यासाठी कोणीही थांबवू शकत नव्हता. त्याने आपल्या मनात पक्का निश्चय केला होता की आज त्याला येशूला पाहायचेच आहे.

आज जगात अनेक असे लोक आहेत ज्यांनी जक्कयासारखे प्रभू येशूविषयी फार काही ऐकले आहे, ते त्याच्या महत्त्वपूर्ण शिक्षणाला ओळखतात. त्यांनी प्रभू येशूच्या सामर्थी तसेच चमत्कारिक कामाविषयी ऐकले होते. त्यांनी अनेकदा ऐकले आहे की, प्रभू येशू ख्रिस्त त्यांना पापाच्या दंडापासून वाचविण्यासाठी स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला. ते समजतात की येशू त्यांच्यासाठी वधस्तंभावर खिळला गेला. ते समजतात की येशू त्यांचा तारणारा आहे, परंतु त्यांचा व्यवहार त्या प्रधानांसारखा आहे ज्यांच्याविषयी योहान १२:४२,४३ मध्ये लिहिले आहे की असे असूनही ''अधिकाऱ्यांतून देखील पुष्कळ जणांनी त्याच्यावर विश्वास ठेवला, परंतु आपण सभा बहिष्कृत होऊ नये म्हणून परूश्यांमुळे ते तसे कबूल करीत नव्हते. कारण त्यांना देवाकडील गौरवापेक्षा मानवाकडील गौरव अधिक प्रिय वाटले.''

पुष्कळसे लोक प्रभूपेक्षा आपल्या स्वत:वर प्रेम करतात. ते घाबरतात की, प्रभू येशूचा स्वीकार केल्याने त्याचे मित्र किंवा संबंधी त्यांच्याशी नाराज होतील. ते घाबरतात की उघडपणे प्रभू येशूला आपला तारणारा मानल्यावर अन्य लोक त्यांचा उपहास करितील. ते लोक समोर येऊन सर्वांसमोर येशूला आपला उद्धारकर्ता मानण्यास लाजतात परंतु जक्कयबद्दल आपण वाचतो की, तो पुढे धावत गेला आणि झाडावर चढला. कारण तो येशूला पाहू इच्छित होता.

त्याची उंची कमी होती, तो ठेंगणा होता. परंतु त्याची ही कमी

येशूला पाहण्यासाठी थांबू शकली नाही. अनेक लोक आपल्या स्वत:ला आत्मिक दृष्टिकोनातून ठेंगणा किंवा लहान अनुभव करतात. ते विचार करतात की मी तर खूप पापी आहे, मी खूप पाप केले आहे, मी प्रत्येक दिवशी पाप करतो, मी यासाठी योग्य नाही की माझं तारण व्हावं. परंतु ते विसरून जातात की प्रभू येशूने म्हटले की कारण मनुष्याचा पुत्र हरवलेले शोधावयास व तारावयास आला आहे. एका आणखी ठिकाणी त्याने म्हटले आहे, ''निरोग्यांना वैद्याची गरज नाही,तर दुखणाइतांना आहे''(मत्तय ९:१२).

यहेज्केल १८:१२-२३ मध्ये आपण बघतो की परमेश्वर म्हणतो, ''तथापि दुष्टाने आपण केलेल्या सर्व पापापासून परावृत्त होऊन माझे सर्व नियम पाळिले आणि तो नितीने व धर्माने वागला तर तो खात्रीने वाचेल, मरावयाचा नाही. त्याने केलेले कोणतेही अपराध त्याच्या हिशोबी धरिले जाणार नाहीत त्याने केलेल्या धार्मिकतेमुळे तो वाचेल. प्रभू परमेश्वर म्हणतो, दुष्टाच्या मरणाने मला संतोष होतो काय? त्याने आपले मार्ग सोडून देऊन वाचावे याने मला संतोष होतो ना?'' आणि (यशया १:१८,१९) मध्ये आपण असे वाचतो ''परमेश्वर म्हणता चला या आपण बुद्धिवाद करू. तुमची पापे लाखेसारखी लाल असली तरी ती बर्फासारखी पांढरी होतील, ती किरमिजासारखी तांबडी असली तरी लोकरीसारखी निघतील. तुम्ही माझे ऐकावयाला मान्य व्हाल तर भूमीचे उत्तम फळ खाल.''

प्रभूसाठी कोणतेही कार्य अशक्य आहे काय? त्याला माहीत आहे की, मनुष्य स्वत: आपलं तारण करू शकत नाही. तो जाणतो की सर्व मनुष्य पापी आहेत आणि अंधारात चालत आहेत. यासाठी तो मनुष्याला वाचविण्यासाठी स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला. तो यासाठी आला की, अंधारात हरवलेल्यांना शोधावयास व त्यांचे तारण करावयास. जर तुम्ही स्वत:ला धार्मिक समजता तर विसरून जा की, येशू तुमच्यासाठी

या पृथ्वीवर आला होता. वास्तविक तो माझ्यासारख्या पापीचे तारण करण्यासाठी आला होता. तो या पृथ्वीवर पेत्रासारख्या लोकांचे तारण करण्यासाठी आला होता. ज्याने प्रभूच्या पवित्र सावलीमध्ये उभे राहून विनंती करून म्हटले होते, ''मी पापी आहे हे प्रभू मी पापी माझ्यापासून माझ्यापासून दूर जा.'' तो पौलासारख्या लोकांसाठी या जगात आला, ज्याने सर्वांसमोर मान्य करून म्हटले होते, ''ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगात आला, हे वचन विश्वसनीय व पूर्णपणे स्वीकारावयास योग्य आहे. त्यापापी लोकांपैकी मी मुख्य आहे'' (पौलाचे तिमथ्याला पहिले पत्र १:१५). मत्तय २१:३१,३२ मध्ये आम्ही वाचतो की प्रभू येशूने त्या काळातल्या धार्मिक निरीक्षकाची गोष्ट करत म्हटले आहे. येशूने त्यास म्हटले, मी तुम्हास खचित सांगतो, जकातदार व कसबिणी तुमच्या आधी देवाच्या राज्यात जातात. (मत्तय २१:३१) ते धार्मिक निरीक्षक जे प्रभूच्या समयी राहत होते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करू शकत नव्हते का? कारण प्रभूने त्यांना सांगितले होते की, योहान तुमच्यामध्ये धर्माच्या मार्गाचा प्रचार करत आला पण तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. पण जकात घेणारे आणि व्यभिचारी यांनी विश्वास ठेवून पश्चात्ताप केला. यासाठी ते परमेश्वराच्या राज्यात प्रवेश करू शकतील.

जक्कय केवळ ठेंगणा नव्हता, परंतु त्याच्यासमोर एक अडखळणं होते की, लोकांची एक फार मोठी गर्दी येशूला घेरून होती. परंतु त्याचा इरादा पक्का होता. त्याने निश्चय केला होता की, आज तो येशूला पाहिल आणि त्याचा इरादा आम्हाला या गोष्टीवरून दिसतो की, या आधी येशू तेथून जाण्यासाठी तेथे पोहचेल. तो धावत जाऊन उंबराच्या झाडावर चढला. त्याने त्या गर्दीला पाहून आपला धीर सोडला नाही.

आज अनेक लोक प्रभू येशूजवळ येण्याचा विचार तर करतात, परंतु त्याचा निश्चय जक्कयासारखा पक्का नाही. त्यांचा निश्चय अर्धवट आहे. कदाचित ते आपल्या मनात विचार करतील की प्रभू येशूला

आपला उद्धारकर्ता मानून ते त्यांचं जीवन प्रभू येशूला देतील? परंतु नंतर त्यांना लक्ष्यात येते की, काय त्यांचे आई-बाप त्यांच्या ह्या निश्चयाला पसंत करतील? जर ते ख्रिस्ती झाले तर काय त्यांचे आई, बाप त्यांना त्यांच्या घरात स्वीकार करतील? त्यांचा समाज किंवा नातेवाईक काय म्हणतील? काय ते आपल्या समाजाकडून,मित्रांकडून स्वीकारण्यात येतील किंवा समाज आणि मित्र त्यांचा स्वीकार करतील? आणि लवकरच त्यांची हिमंत हारते. ते या सर्व कठीण परिस्थितीचा सामना करायला तयार नाहीत. त्याचं मन अशा जमिनीसारखं आहे त्यामध्ये बी पेरलेले आहे, परंतु उगवण्यापूर्वीच त्या लहानशा रोपाला झाडे दाबून टाकतात. त्यांचा निश्चय अर्धवट आहे. त्याच्यात साहस नाही आणि वास्तविक असल्याप्रकारचे लोक येशूकडे कधीच येत नाहीत. कारण प्रभू येशूने म्हटले, ''जो माझ्यापेक्षा आपल्या बापावर किंवा आईवर अधिक प्रेम करितो तो मला योग्य नाही. जो माझ्यापेक्षा मुलावर किंवा मुलीवर अधिक प्रेम करितो तो मला योग्य नाही आणि जो आपला वधस्तंभ उचलून घेऊन माझ्या मागे येत नाही तो मला योग्य नाही'' (मत्तय १०:३७,३८).

वास्तविक कोणताच मनुष्य प्रभूच्या मागे रिकाम्या हाताने कधीच चालू शकत नाही. ते सर्व जे येशू ख्रिस्ताच्या मागे चालण्याचा निश्चय करतात त्यांना आपला वधस्तंभ उचलून घेऊन त्याच्यामागे चालावे लागते आणि याचा अर्थ असा आहे की त्यांना येशूसारख्या दु:खाचा आणि कठीण प्रसंगाचा सामना करण्यास तयार राहावं लागतं. जसा येशू वधस्तंभावर बलीदान होण्यासाठी स्वर्ग सोडून पृथ्वीवर आला होता. येशूच्या मागे चालायला त्यांना जग सोडावं लागतं. एकदा जेव्हा एका मनुष्याला येशूच्या मागे येण्यासाठी बोलावले तर लूक ९:५९ मध्ये लिहिले आहे तर त्याने प्रभूला म्हटले होते, ''परंतु तो म्हणाला, प्रभूजी पहिल्याने मला माझ्या बापाला पुरावयास जाऊ द्या. तो त्याला म्हणाला,

मेलेल्यांना आपल्या मेलेल्यास पुरू दे. तू जाऊन देवाच्या राज्याची घोषणा कर." प्रभूची इच्छा आहे की, आम्ही आमच्या जीवनात सर्वप्रथम आणि उत्तम स्थान केवळ येशूलाच द्यावे. जर आम्हाला प्रभू येशूचे अनुसरण करायची इच्छा आहे तर आम्हाला त्याच्या मागे आपला वधस्तंभ घेऊन चालावे लागेल. परंतु त्याने आम्हाला असे कार्य करायची आज्ञा दिली नाही की, जी अशक्य आहे. कारण आपण पाहतो की, तो स्वत: सर्वात प्रथम आमच्या पुढे पुढे आपला वधस्तंभ घेऊन चालला.

म्हणून जेव्हा प्रभू येशूने जक्कयच्या हृदयाला दृढ निश्चयाने पाहिले, तर त्याने जक्कयाला म्हटले जक्कया त्वरा करून खाली ये कारण मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे. जेव्हा मनुष्याच्या हृदयात कोणते कार्य करण्याचा दृढ निश्चय असतो तर त्याला अवश्य सफलता प्राप्त होते. आमच्या देशाच्या मोठमोठ्या नेत्यांनी आपल्या दृढ निश्चयाच्या जोरावरच स्वतंत्रता प्राप्त केली होती. जेव्हा कोलंबसने धैर्य तथा निश्चयाने आपल्या यात्रेची सुरूवात केली तर त्याला यश मिळाले. प्रभू येशूच्या मागे चालायला एक दृढ निश्चयाचीच आवश्यकता असते. येशूने त्याला म्हटले, "जो कोणी नांगराला हात घातल्यावर मागे पाहतो तो देवाच्या राज्यास उपयोगी नाही." (लूक ९:६२). परंतु त्याने प्रतिज्ञा करून म्हटले, "जो मरेपर्यंत विश्वासू राहील त्याला मी जीवनाचा मुगुट देईन" (प्रकटीकरण २:१०). आणि वास्तविक या अधिक मनुष्याला काय पाहिजे ? मत्तय १६:२४-२६ या वचनात मग येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, माझ्या मागे येण्याची कोणाची इच्छा असेल तर त्याने स्वत:चा त्याग करावा व आपला वधस्तंभ घेऊन मला अनुसरावे, कारण जो कोणी आपला जीव वाचवू पाहतो, तो आपल्या जीवाला मुकेल आणि जो कोणी माझ्याकरिता आपल्या जीवाला मुकेल त्याला तो मिळेल. मनुष्याने सर्व जग मिळविले आणि आपला जीव गमावला तर त्याला काय लाभ? अथवा मनुष्य आपल्या जिवाबद्दल काय मोबदला देणार?

कदाचित तुमच्याजवळ धन, संपत्ती असेल किंवा होऊ शकते जगाची काही अशी एखादी वस्तू असेल ज्यावर तुम्ही खूप गर्व आणि भरोसा करीत असाल. परंतु तुम्ही तुमच्या आत्म्याला वाचविण्यासाठी ती वस्तू देऊ शकता?

मित्रांनो, जगाच्या कोणत्याच वस्तूमध्ये तुमच्या आत्म्याला वाचविण्याची शक्ती नाही. जर तुमच्याजवळ येशू नाही तर तुम्ही कंगाल व दरिद्री आहात. तुमच्याजवळ वास्तविक काही नाही. परंतु जेव्हा जक्कयने येशूला प्राप्त केले तर त्याने म्हटले हे प्रभू पहा, मी आपले अर्धे द्रव्य दरिद्र्यास देतो, मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करितो. येथे आपण दोन विशेष गोष्टी पाहतो, पहिली ही की जक्कयाने आपल्या संपत्तीचा सदुपयोग करण्याचा निर्णय केला. त्याने आपली संपत्ती गोरगरिबांमध्ये वाटण्याचा निश्चय केला. कारण त्याला येशूमध्ये सर्वात मोठी संपत्ती मिळाली होती. दुसरीकडे आपण पाहाते की, त्याने पश्चात्ताप केला. त्याने म्हटले की, मी अन्यायाने कोणाचे काही घेतले असेल तर ते चौपट परत करितो. त्याने आपले जीवन बदलण्याचा निश्चय केला तर जेव्हा येशूने पाहिले की जक्कय आपल्या पापापासून पश्चात्ताप करत आहे तेव्हा येशूने त्याला म्हटले, ''आज ह्या घराला तारण प्राप्त झाले आहे.''

जक्कय खूप आनंदीत होता. लिहिले आहे, जेव्हा येशूने त्याला म्हटले की आज मला तुझ्या घरी उतरावयाचे आहे मग तो त्वरेने खाली उतरून आनंदाने त्याला घरी घेऊन गेला. तो आनंदी होता. कारण त्याला येशू भेटला होता.तुम्हीपण येशूला प्राप्त करू शकता. येशूने म्हटले '' अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणावर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या जिवास विसावा मिळेल. कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे'' (मत्तय

११:२८-३०). जक्कयाविषयी लिहिले आहे तो धावत जाऊन प्रभूला भेटायला गेला. तुम्ही प्रभूच्या या आमंत्रणाचा स्वीकार करायला धावत पुढे याल काय? प्रगटीकरण ३:२० या वचनात येशूने म्हटले, ''पहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकीत आहे, जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवीन आणि तो माझ्याबरोबर जेवील.'' जक्कय आनंदाने प्रभू येशूला आपल्या घरी घेऊन गेला. येशूला तुम्ही आज आनंदाने, प्रसन्नतेने आपल्या मनात स्वीकार कराल? ऐका, येशू म्हणतो, पहा मी दाराशी उभा आहे व दार ठोकीत आहे. जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवीन आणि तो माझ्याबरोबर जेवील. तुम्ही ऐकत आहात काय? होय. आज जवळजवळ दोन हजार वर्षांपूर्वी जेव्हा येशू यरीहोवरून जात होता. आज जक्कयासारखे पुढे होऊन येशू तुमच्यासमोरून जात आहे. तुम्ही धावत जाऊन त्याच्यापुढे याल. त्याला सामोरे व्हाल? तुम्ही त्याला आपल्या घरी स्वीकाराल? जक्कयसारखा तुम्हाला सार्वकालीक जीवन देऊ इच्छितो.तो तुमचे तारण करू इच्छितो. येशूने म्हटले, ''जो विश्वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल'' (मार्क १६:१६). तुम्ही त्याचा स्वीकार कराल ? त्याच्यावर विश्वास ठेवा. त्याच्या आज्ञा पाळा. त्याने म्हटले, ''माझ्यावर तुमची प्रीति असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल'' (योहान १४:१५). तुम्ही त्याचे ऐकणार नाही काय? ज्याने तुम्हाला वाचविण्यासाठी स्वत:ला दिले.

• • •



# शांती तर शांती देण्यानेच मिळेल

**- टॉम हॉलैंड**

**श**ब्दांमध्ये दोन प्रकारची क्षमता असते, जखमांना ताजे करण्याची आणि त्यांना भरण्याची. पवित्र शास्त्रामध्ये जखम भरण्याचा शब्द आहे, ''शांती''. नव्या करारात या शब्दाचा उपयोग पुष्कळदा मिळतो. या शब्दाचा अक्षरश: अर्थ आहे ''च्या जवळ बोलावणे'' (करिंथकरास दुसरे पत्र १:३,४, ७:१३). सात्वना, सहायता, धाडस, ताजे होणे, सांभाळणे इत्यादी याचे मिळतेजुळते शब्द आहेत.

अधिकतर लोकांना जीवनामध्ये काही वेळेस शांतीची आवश्यकता असते. दु:ख आणि त्रास सर्वांच्याच जीवनात येतात. जीवनामध्ये दु:ख आणि निराशेचा सामना करणे हा पण एक आशीर्वाद आहे. कारण याकडून व्यक्ती त्या लोकांना शांती देण्यासाठी मानसिक रीतीने तयार होतो जे त्याला दु:खी दिसतात.

प्रेषित पौल याप्रकारे म्हणतो की, ''आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता, जो करूणाकार पिता व सर्वसांत्वनदाता देव, तो धन्यवादित

असो, तो आमच्यावरील सर्व संकटात आमचे सांत्वन करितो असे की ज्या सांत्वनाने आम्हाला स्वत: देवाकडून सांत्वन मिळते त्या सांत्वनाने आम्ही जे कोणी कोणत्याही संकटात आहोत त्याचे सांत्वन करावयास समर्थ व्हावे'' (पौलाचे करिंथकरास दुसरे पत्र १:३,४).

परमेश्वर आपल्या वचनाच्याद्वारे आम्हाला शांती देतो. (पौलाचे थेस्सलनीकारांस पहिले पत्र ४:१८) जर आपण ऐकतो तर परमेश्वर आपल्यावर प्रेम करेल. (रोमकरास पत्र ८:३८,३९). परमेश्वर आमच्याशी करार करतो की,तो आम्हाला परीक्षेत अपयशी होऊ देणार नाही (करिंथकरास पहिले पत्र १०:१३). परमेश्वराने आमच्याबरोबर राहण्याची प्रतिज्ञा केली आहे (इब्री लोकास पत्र १३:५,६). दिवस असो की रात्र असो, कोणत्याही समयी आपण परमेश्वराच्या सिंहासनापर्यंत पोहचू शकतो.

परमेश्वर आपल्या लोकांद्वारे आम्हाला शांती देतो (करिंथकरास दुसरे पत्र १:४). परमेश्वराच्या लोकांच्या मनात दुसऱ्यांसाठी चिंता तसेच प्रेम आहे. या कारणाने ते त्या लोकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करतात. जे कोणत्याही प्रकारच्या दु:खात आहेत त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांना सांत्वना देतात, त्यांचे धाडस बांधतात आणि त्यांची सहाय्यता करतात आणि त्यांच्यावर प्रत्येक प्रकारे लक्ष ठेवतात.

• • •



# केवळ एकच खरा परमेश्वर आहे

**- मेकसी बी. बोरेन**

जुन्या कराराच्या पहिल्याच वचनात पवित्रशास्त्र सर्व शक्तीमानाच्या रचनात्मक प्रतिमा आणि शक्तीला सर्व गोष्टीचे अस्तित्व दाखवत आहे. प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली. (उत्पत्ती १:१) आणि लक्षात ठेवा की पवित्र लेख काय घोषणा करतो, ''परमेश्वराच्या शब्दाने आकाश निर्माण झाले, त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सर्व सैन्य निर्माण झाले. अखिल पृथ्वी परमेश्वराचे भय धरो, जगात राहणारे सर्व त्याचा धाक बाळगोत'' (स्तोत्रसंहिता ३३:६,८). कारण सहा दिवसात परमेश्वराने आकाश, पृथ्वी, समुद्र व त्यातील सर्व काही निर्माण केले'' (निर्गम २०:११). ''परमेश्वराने पृथ्वीचा पाया ज्ञानाने घातला, त्याने बुद्धीने आकाश निर्माण केले'' (नितिसूत्रे ३:१९). महान देवावर विचार करा. असे ज्ञान, बुद्धी, समज आणि सामर्थ्य जे सर्व वस्तूंच्या सृष्टीत होणे आवश्यक होते. किती कमालीची गोष्ट आहे.

हा विचार करणे खरोखर अद्भूत आहे. मनुष्याचा सीमित विचार

परमेश्वराच्या अगाध बुद्धीच्या सामर्थ्याला समजू शकत नाही. परंतु एक गोष्ट पक्की आहे की, संपूर्ण मनुष्यजातीमध्ये जिवंत परमेश्वराला खरोखर उंच केल्या जायला पाहिजे.

प्राचीनकाळच्या स्तोत्रकर्त्याने लिहिले आहे, ''आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शविते. दिवस दिवसाशी संवाद करितो, रात्र रात्रीला ज्ञान प्रगट करिते. वाचा नाही, शब्द नाही, त्याची वाणी ऐकू येत नाही'' (स्तोत्रसहिता १९:१-३).जगभराच्या डिझाईन आणि सुंदरतेला पाहून काही संशय राहू शकत नाही की एक श्रेष्ठ कलाकार आणि सृष्टीकर्ता खरोखरच आहे. एका सत्यतेचे प्रमाण प्रत्येक दिवशी प्रत्येक रात्री स्वाभाविक जगामध्ये ज्यामध्ये आपण राहतो, पाहिल्या जावू शकते, असा काही प्रकार, प्रथा नाही की हे आपोआपच झाल्या असेल. यिर्मया संदेष्ट्याने असे लिहिले आहे, 'अहा प्रभू परमेश्वरा ! पाहा तू आपल्या महासामर्थ्याने व आपल्या उभारलेल्या बाहूने आकाश व पृथ्वी उत्पन्न केली. तूला अवघड असे काही नाही (यिर्मया ३२:१७). ती परमेश्वराच्या नामांचे स्तवन करोत. कारण त्याने आज्ञा केली, आणि ती निर्माण झाली. ही सगळी परमेश्वराच्या नावाने स्तवन करोत, कारण केवळ त्याचेच नाव उच्च आहे. त्याचे ऐश्वर्य पृथ्वीच्या व आकाशाच्या वर आहे. (स्तोत्रसंहिता १४८:५,१३).

यामध्ये काही आश्चर्य नाही की पौल नावाच्या येशू ख्रिस्ताच्या एका प्रेषिताने प्राचीन काळच्या अन्य जातीच्या नास्तिक मनावर दोष लावला होता. त्याने लिहिले होते, ''कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थावरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत. अशासाठी की त्यांना कसलीही सबब राहू नये. देवाला ओळखूनसुद्धा त्यांनी देव म्हणून त्याचे गौरव केले नाही किंवा त्याचे आभार मानले नाहीत; पण

ते आपल्या कल्पनांनी शून्यवत झाले आणि त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले. स्वत:ला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले आणि अविनाशी देवाच्या गौरवाची नाशवंत मनुष्य, पक्षी, चतुष्पाद पशु व सरपटणारे प्राणी ह्यांच्या प्रतिमेच्या रूपाशी त्यांनी अदलाबदल केली. ह्यामुळे ते आपल्या वासनात असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले, असे की त्यांच्या देहाची त्यांच्या त्यांच्यातच विटंबना व्हावी. (रोमकरास पत्र १:२०-२४)

दु:खाची गोष्ट ही आहे की परमेश्वराच्या प्रेरणेने लिहिल्या गेलेले इतके जुने शब्द आजही एकविसाव्या शतकाच्या जगात अनेक भागात लागू होतात. पुष्कळशा लोकांनी एका खऱ्या आणि जिवंत देवावर विश्वास न ठेवता आपल्या हातांनी बनविलेल्या मूर्तीवर विश्वास ठेवला आहे. कृपा करून लक्ष द्या की, पहिल्या शतकाच्या आपल्या जीवनकार्यात पौलाने जे काही पाहिले त्याने त्यांना रागविले होते. अथेनैकरांना त्याने म्हटले होते, ‘‘तेव्हा पौल अरीयपगाच्या मध्यभागी उभा राहून म्हणाला, अहो अथैनेकरांनो, तुम्ही सर्व बाबतीत देवदेवतांना फार मान देणारे आहा असे मला दिसते कारण मी फिरता फिरता तुमच्या पूज्य वस्तू पाहतांना अज्ञान देवाला ही अक्षरे लिहिलेली वेदी मला आढळली, ज्याचे तुम्ही अज्ञानाने भजन करिता ते मी तुम्हाला जाहीर करितो. ज्या देवाने जग व त्यातले अवघे निर्माण केले तो स्वर्गाचा व पृथ्वीचा प्रभू असून हातांनी बांधलेल्या मंदिरात राहत नाही आणि त्याला काही उणे आहे म्हणून माणसांच्या हातून त्याची सेवा घडावी असेही नाही. कारण जीवन, प्राण व सर्व काही तो सर्वांना देतो आणि त्याने एकापासून माणसाची सर्व राष्ट्रे निर्माण करून त्यांनी पृथ्वीच्या संबंध पाठीवर राहावे असे केले आहे आणि त्यांचे नेमलेले समय व त्यांच्या वस्तीच्या सीमा त्यांनी ठरविल्या आहेत. अशासाठी की

त्यांनी देवाचा शोध करावा म्हणजे चाचपडत चाचपडत त्याला कसे तरी प्राप्त करून घ्यावे, तो आपल्यापैकी कोणापासूनही दूर नाही. कारण आपण त्याच्याठायी जगतो, वागतो व आहो तसेच तुमच्या कविपैकीही कित्येकांनी म्हटले आहे की, आपण वास्तविक त्याचा वंश आहो तर मग आपण देवाचे वंशज असताना मनुष्याच्या चातुर्याने व कल्पनेने कोरलेले सोने, रूपे किंवा पाषाण ह्यांच्या आकृतीसारखा देव असे आपल्याला वाटता कामा नये. (प्रेषितांची कृत्ये १७:२२-२९)

आणि मग इफिसात प्रेषितांनी घोषणा केली, हातांनी केलेले देव हे देवच नाहीत असे ह्या पौलाने केवळ इफिसातच नव्हे तर बहुतेक सर्व आशिया प्रांतात बोलून व पुष्कळ लोकांच्या मनात भरवून त्यांना फितविले आहे. (प्रेषितांची कृत्ये १९:२६)

या सर्व गोष्टींना लक्षात घेऊन मी आज लोकांना विनंती करतो की ते मूर्तीपूजेच्या कोणत्याही प्रकाराला सोडून खऱ्या आणि जिवंत परमेश्वराजवळ यावे ज्याने सर्व काही बनविले आहे. पवित्रशास्त्र वाचा व त्याचे अध्ययन करा, जे प्रत्येक युगासाठी संपूर्ण मानवजातीसाठी त्याची प्रगट केलेली इच्छा आहे. आपल्या आत्मिक लाभासाठी याला आपली प्रेरणा बनवा. हे तुमच्या जीवनाची मार्गदर्शिका आणि सल्लागार बनेल. हे तुम्हाला केवळ परमेश्वराची सृजनात्मकच शक्तीबद्दल नाही, परंतु तुमच्या जीवाला पापापासून वाचविण्यासाठी परमेश्वराच्या सामर्थ्याविषयी सांगत आहे. जे त्याचा पूत्र प्रभू येशूख्रिस्ताची सुवार्ता आहे. त्याच प्रेषिताने ज्याची गोष्ट वर या लेखामध्ये वर केली गेली आहे. लिहिले, ''कारण मला सुवार्तेची लाज वाटत नाही. कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला प्रथम यहुद्याला मग हेल्लेण्याला तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे'' (रोमकरास पत्र १:१६).

• • •

# येशू कशासाठी आला ?

**- जॉन एल. व्हीडर**

**प**वित्र शास्त्र सांगते की, प्रारंभी येशू परमेश्वराबरोबर होता. ''प्रारंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता आणि शब्द देव होता, तोच प्रारंभी देवासह होता. सर्व काही त्याच्याद्वारे झाले. जे काही झाले ते त्याच्यावाचून झाले नाही. त्याच्याठायी जीवन होते व ते जीवन मनुष्यमात्राचा प्रकाश होते. तो प्रकाश अंधारात प्रकाशतो तरी अंधाराने त्याला ग्रासले नाही'' (योहान १:१-५). १४ व्या वचनात आम्हाला माहिती मिळते की, ''शब्द देही झाला आणि त्याने आम्हामध्ये वस्ती केली आणि आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचे गौरव असावे असे अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होते.'' या वचनामध्ये आम्हाला माहिती होते की ते वचन देहधारी झाले आणि आमच्यामध्ये राहिले. स्पष्टपणे हे येशूसाठीच लिहिल्या गेले आहे आणि पुन्हा पवित्र शास्त्र सांगते की, ''तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वत:ला रिक्त केले म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले आणि मनुष्य प्रकृतीचे असे होऊन त्याने मरण आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले. येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वत:ला लीन केले. ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले आणि सर्व नावापेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले. ह्यात हेतू हा की स्वर्गात पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे. (फिलिप्पैकरास पत्र २:६-११)

या पृथ्वीवर येण्याआधी जेव्हा पिता परमेश्वराबरोबर इतके उंच पद होते तेव्हा ते इतके मोठे पद सोडून येशू पृथ्वीवर का आला होता? पवित्र शास्त्र याचे सुंदर उत्तर देते, येशू परमेश्वराच्या महान प्रेमाला दाखवायला या जगात आमच्याजवळ आला. कारण ''देवाने जगावर एवढी प्रीती केली की त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे तर त्याच्याद्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठविले. जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्यायनिवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवीत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे. कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही. निवाडा हाच आहे की जगात प्रकाश आला आहे आणि मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरली. कारण त्यांची कृत्ये दुष्ट होती. कारण जो कोणी वाईट कृत्ये करतो तो प्रकाशाचा द्वेष करितो आणि आपली कृत्ये उघडकीस येऊ नये म्हणून प्रकाशाकडे येत नाही; परंतु जो सत्य आचरितो तो प्रकाशाकडे येतो. ह्यासाठी की आपली कृत्ये देवाच्या ठायी केलेली आहेत हे उघड व्हावे'' (योहान ३:१६-२१). येशूच्या येण्यानेच आम्हाला परमेश्वराच्या प्रेमाची उमज आली. त्याच्या येण्याने मनुष्य आणि त्याच्या कामाचे सत्यही समोर आले. येशूने म्हटले ''जी कृत्ये दुसऱ्या कोणी केली नाहीत ती मी त्याच्यामध्ये केली नसती तर त्यांच्याकडे पाप नसते, परंतु आता त्यांनी मला व माझ्या पित्यालाही पाहिले आहे व आमचा द्वेष केला आहे.'' (योहान १५:२४). येशू आला यासाठी मनुष्य आपल्या कामासाठी स्वत: जबाबदार आहे. त्याच्याजवळ काहीच कारणे नाही. तो मनुष्याच्या मार्गात प्रकाश टाकायला आला आहे.

येशूने म्हटले, ''...... निरोग्यांना वैद्याची गरज नाही तर दुखणाइतकांना आहे. मला दया पाहिजे, यज्ञ नको. ह्याचा अर्थ काय हे जाऊन शिका, कारण नितिमानांना नव्हे तर पापी लोकांना बोलाविण्यासाठी मी आलो आहे. (मत्तय ९:१२,१३) तर मग स्पष्ट आहे येशूचा पृथ्वीवर येण्याचा उद्देश पापी लोकांना पश्चात्ताप करून बोलावण्याचा होता. परमेश्वराने मनुष्याला पवित्र अवस्थेमध्ये निर्माण केले होते. परंतु मनुष्य पापी बनला. खरोखर जलप्रलयाआधी ''देवाने पाहिले की पृथ्वीवर मानवाची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनातील येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात असे परमेश्वराने पाहिले.'' (उत्पत्ती ६:५) यासाठी मनुष्याच्या वाईटाला नष्ट करण्यासाठी जलप्रलय आणावा लागला. प्रेषित पेत्राने जलप्रलयाची गोष्ट करून मनुष्याच्या विनाशाची गोष्ट सांगितली आणि म्हटले, ''कित्येक ज्याला विलंब म्हणून म्हणतात तसा विलंब प्रभू आपल्या वचनाविषयी करीत नाही, तर तो तुमचे धीराने सहन करितो, कोणाचा नाश व्हावा अशी त्याची इच्छा नाही तर सर्वांनी पश्चात्ताप करावा अशी आहे. (पेत्राचे दुसरे पत्र ३:१९) संपूर्ण पृथ्वीवर सर्व प्रकारच्या वाईटाला पाहून परमेश्वर प्रसन्न होत नाही. हे तर मनुष्यासाठी त्याचा विलंब आणि धीर आहे की तो मनुष्याला त्याच्या पापाची आठवण करून त्याच्या पापासाठी पश्चात्ताप करण्याकडे आणतो.

येशूची आवड फक्त मनुष्याला चांगले बनविण्याची नव्हती परंतु त्याचा उद्देश मनुष्याला पापाच्या अनंत परिणामापासून वाचविण्याचा होता. पवित्र शास्त्र दाखवतो की, ''कारण पापाचे वेतन मरण आहे पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे. (रोमकरास पत्र ६:२३). प्रेषित पौलाने म्हटले, ''ख्रिस्त येशू पापी लोकांना तारावयास जगात आला, हे वचन विश्वसनीय व पूर्णपणे

स्वीकारावयास योग्य आहे; त्या पापी लोकांपैकी मी मुख्य आहे.'' (पौलाचे तिमथ्याला पहिले पत्र १:१५). याच प्रकारे त्याचे कार्य मनुष्याला फक्त त्याच्या पापासाठी परिचितच करायचेच नव्हते परंतु पापापासून वाचवायचे होते. ''तो पूत्र असूनही त्याने जे दु:ख सोसले तेणेकरून तो आज्ञाधारकपणा शिकला आणि परिपूर्ण केला जाऊन तो आपल्या आज्ञेत राहणाऱ्या सर्वांचा युगानुयुगीच्या तारणाचा कर्ता झाला'' (इब्री लोकास पत्र ५:८,९).

पाप आणि वाईटाचा संबंध सैतानाशी राहीला आहे. पाप करणारा सैतानाचा आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करीत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रगट झाला. (योहानाचे पहिले पत्र ३:८) म्हणून त्याच्या येण्याचा उद्देश सैतानाच्या कामांना नष्ट करण्याचा होता. सैतानाचे काम अंधकाराचे आहेत ज्यामध्ये छळ, कपट आणि सर्वप्रकारचा वाईटपणा असतो.

येशूचा जगात येण्याचा आणखी एक उद्देश आपला कित्ता देऊन समजावण्याचा होता की आमचे जीवन कसे असायला पाहिजे. पेत्राने म्हटले, ''कारण ह्याचकरिता तुम्हास पाचारण करण्यात आले आहे. कारण ख्रिस्तानेही तुम्हासाठी दु:ख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलावर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुम्हाकरिता कित्ता घालून दिला आहे; त्याने पाप केले नाही आणि त्याच्या मुखात कपट आढळले नाही. त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही; दु:ख भोगीत असता त्याने धमकाविले नाही; तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे स्वत:ला सोपूवन दिले, त्याने स्वत: तुमची आमची पापे स्वदेही वाहून खांबावर नेली, ह्यासाठी की आपण पापाला मेलेले होऊन सदाचरणासाठी जगावे. त्याला बसलेल्या फटक्याने तुम्ही निरोगी झाला आहा. (पेत्राचे पहिले पत्र २:२१-२४). आदामापासून सर्व लोकांमध्ये केवळ येशूच

एकटा आहे ज्याचे जीवन या पृथ्वीवर निष्पाप राहिले आहे. तो आमच्यासारखा सर्व गोष्टीत पारखल्या गेला होता परंतु निष्पाप राहिला.

येशूचे दाखले आणि शिक्षणाचा लोकांवर प्रभाव न पडण्याचे कारण केवळ हेच आहे. त्याचा उपयोग केला गेला नाही. दु:खाची गोष्ट ही आहे की आज पुष्कळसे लोक आहेत जे येशूचा शिष्य होण्याचा दावा करतात, परंतु ते त्याच्या दाखल्याला, कित्याला आपल्या जीवनामध्ये लागू करत नाहीत आणि त्याच्या वचनावर आणि पदावर चालत नाही. येशूने त्याच्या कार्याद्वारे आणि वचनाद्वारे मनुष्याला या जीवनात आनंद मिळण्यासाठी आणि येणाऱ्या जीवनाची तयारी करण्याचे पद्धत सांगितली आहे.

येशूचे या जगात येण्याचे आणखी एक कारण आहे की आमच्या जागी मरणे आहे. त्याला माहीत होते की, ''पापाचे वेतन मरण आहे'' (रोमकरास पत्र ६:२३) याच कारणाने मनुष्याचे अनंत मृत्युमध्ये जाणे ठरलेले होते. मनुष्यासाठी आपले प्रेम आणि करूणेच्या कारणाने तो त्याच्या स्थानावर स्वत: मरण पावला.

''आपण दुर्बल असतानाच ख्रिस्त सुवेळी अभक्तांसाठी मरण पावला. नीतिमान मनुष्यासाठी कोणी मरणारा विरळा. चांगल्या मनुष्यासाठी मरण्यास कदाचित कोणी धाडस करीत. देव आपणावरच्या प्रीतिचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपणासाठी मरण पावला'' (रोमकरास पत्र ५:६-८). येशूने आपल्या शरीरामध्ये आमच्या पापांना वधस्तंभावर टांगले. यासाठी की आपण जिवंत राहू. मनुष्य जातीसाठी मनुष्य आणि ख्रिस्ताचे प्रेम याच गोष्टीवरून कळते,की आमच्या जागी तो मरायला तयार झाला.

परंतु मृत्यू त्याला बांधून ठेवू शकला नाही म्हणून आमच्या

पापापासून सोडविण्यासाठी त्याला मरणानंतर जिवंत केल्या गेले. जिवंत झाल्यावर तो पित्याच्या उजव्या हाताशी जाऊन बसला. तेथून तो आजही राज्य करतो. त्या येशूला देवाने उठविले ह्याविषयी आम्ही सर्व साक्षी आहोत म्हणून तो देवाच्या उजव्या हाताकडे बसविलेला आहे. त्याला पवित्र आत्म्याविषयीचे वचन पित्यापासून प्राप्त झाले आहे आणि तुम्ही जे पाहता व ऐकता त्याचा त्याने वर्षाव केला आहे. (प्रेषितांची कृत्ये २:३२,३३). जर येशू जगात आला नसता तर त्याला ते पद मिळाले नसते. येशूने या संधीचा काही लाभ उचलला नाही की तो देवाबरोबर होईल.''तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही तर त्याने स्वत:ला रिक्त केले. म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले आणि मनुष्यप्रकृतीचे असे प्रगट त्याने मरण आणि तेही वधस्तंभावरचे मरण सोसले. येथपर्यंत आज्ञापालन करून त्याने स्वत:ला लीन केले. ह्यामुळे देवाने त्याला अत्युच्च केले आणि सर्व नावापेक्षा जे श्रेष्ठ नाव ते त्याला दिले. ह्यात हेतू हा की स्वर्गात, पृथ्वीवर व पृथ्वीखाली प्रत्येक गुडघा येशूच्या नावाने टेकला जावा आणि देवपित्याच्या गौरवासाठी प्रत्येक जिभेने येशू ख्रिस्त हा प्रभू आहे असे कबूल करावे. म्हणून माझ्या प्रिय जनहो, जे तुम्ही सर्वदा आज्ञापालन करीत आला आहो, ते तुम्ही, मी जवळ असता केवळ नव्हे तर विशेष करून आता म्हणजे मी जवळ नसतांनाही, भीत व कापत आपले तारण साधून घ्या'' (फिलिप्पैकरास पत्र २:६-१२). येशूच्या विनम्रतेने आणि आज्ञा मानण्याच्या कारणाने देवाने त्याला किती मोठे पद दिले आहे.

• • •

# परमेश्वराच्या योजनेमध्ये यहुदी आणि अन्य जाती

**- रॉयस फ्रेड्रीक**

**म**नुष्यजातीसाठी आपली योजना पुढे ठेवण्यासाठी परमेश्वराने एक विशेष जात ''इस्त्राएल'' बनविली. ज्यांना यहुदी म्हटल्या जाते. अन्य जातीच्या लोकांना अन्य जाती किंवा केवळ जाती म्हटल्या जाते. निसंशयच इस्त्राएल परमेश्वराची निवडलेली जात किंवा वंश होता. परंतु त्यांच्याद्वारे सर्व जातीच्या लोकांना आशीर्वाद देण्याची गोष्ट केली गेली आहे.

जवळजवळ ४००० वर्षापूर्वी अन्य जातीबद्दल आब्राहमाला पाचारण मिळाले होते. ''परमेश्वराने अब्राहामास सांगितले, तू आपला देश, आपले नातेवाईक व आपल्या बापाचे घर सोडून मी दाखवीन त्या देशात जा. मी तुजपासून मोठे राष्ट्र, निर्माण करीन. मी तुला आशीर्वाद देईन, तुझे नाव मोठे करीन, तू आशीर्वादीत होशील. तुझे जे अनिष्ट चिंततील त्याचे मी अनिष्ट करीन. तुझ्याद्वारे पृथ्वीवरील सर्व कुळे आर्शीवादीत होतील'' (उत्पत्ती १२:१३). नंतर परमेश्वराने ही प्रतिज्ञा पुन्हा केली. ''तू माझा शब्द ऐकला म्हणून पृथ्वीवरची सर्व राष्ट्रे तुझ्या

संततीद्वारे आशीर्वादीत होतील'' (उत्पत्ती २२:१८).

अब्राहामाचा पूत्र इसहाकबरोबर अन्य जातीच्या संबंधित याच प्रतिज्ञेला पुन्हा म्हटले आहे, ''मी आकाशातील ताऱ्याइतके तुझी संतती वाढवीन, हे सर्व देश तुझ्या संततीस देईन आणि पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे तुझ्या संततीच्याद्वारे आशीर्वादीत होतील''(उत्पत्ती २६:४). जवळजवळ तीन हजार वर्ष आधी दाविदाने भविष्यवाणी केली होती ''दिगंतरीचे सर्व जन परमेश्वराला स्मरून त्याच्याकडे वळतील'' (स्तोत्रसंहिता २२:२७). आणि ''हे प्रभू, तू उत्पन्न केलेली सर्व राष्ट्रे येऊन तुझ्या पाया पडतील, तुझ्या नावाचा महिमा गातील'' (स्तोत्रसंहिता ८६:९). एका ठिकाणी आणखी तो म्हणतो, ''अहो सर्व राष्ट्रांनो, परमेश्वराचे स्तवन करा, अहो सर्व लोकांनो त्याचे स्तवन करा'' (स्तोत्रसंहिता ११७:१,२).

जवळ जवळ सत्ताविशे वर्षापूर्वी यशयाने भविष्यवाणी केली होती, ''शेवटच्या दिवशी असे होईल की परमेश्वराच्या मंदिराचा डोंगर पर्वताच्या माथ्यावर स्थापन्यात येईल आणि सर्व डोंगराहून तो उंच होईल. त्याकडे सर्व राष्ट्रातील लोक लोटतील'' (यशया २:२). ''त्यासमयी असे होईल की राष्ट्रांकरिता ध्वजवंत उभारिलेल्या इशायाच्या धुमाऱ्याला राष्ट्रे शरण येतील; त्याचे निवासस्थान गौरवयुक्त होईल'' (यशया ११:१०). ''पहा हा माझा सेवक याला मी आधार आहे. पाहा हा माझा निवडलेला याजविषयी माझा जीव संतुष्ट आहे. याच्याठायी मी आपला आत्मा घातला आहे. तो राष्ट्रास न्याय प्राप्त करून देईल (यशया ४२:१). ''मी परमेश्वराने न्यायानुसार तुला बोलविले आहे, मी तुझा हात धरिला आहे, तुला राखिले आहे, तू लोकांना करार व राष्ट्रांना प्रकाश देणारा असे मी तुला करीन.आंधळ्याचे डोळे उघडावे, बंदिशाळेतून बंदिवानास व अंधारात बसलेल्यास कारागृहातून बाहेर काढावे म्हणून मी असे करीन'' (यशया ४२:६-७). तो परमेश्वर म्हणतो, याकोबाच्या वंशाचा


उद्धार करावा. इस्त्राएलाच्या रक्षिलेल्या लोकास परत आणावे म्हणून तू माझा सेवक व्हावे यात काही मोठेसे नाही तर मजकडून होणारे तारण तू दिगंतापर्यंत न्यावे म्हणून मी तुला राष्ट्राचा प्रकाश असा नेमितो(यशया ४९:६).

जवळजवळ सव्वीसशे वर्षापूर्वी दानिएलाने भविष्यवाणी केली होती, ''तेव्हा मी रात्रीच्या दृष्टांतात पाहिले तो आकाशातील मेघावर आरूढ होऊन मानव पुत्रासारखा कोणी आला, तो त्या पुराणपुरुषाकडे आला व त्यास त्यांनी त्याच्या जवळ नेले. सर्व लोक, सर्व राष्ट्रे व सर्व भाषा बोलणारे लोक यांनी त्याची सेवा करावी म्हणून त्यास प्रभुत्व, वैभव व राज्यही दिली. त्याचे प्रभूत्व अक्षय व अढळ आहे'' (दानिएल ७:१३-१४, दानिएल २:३५ आणि ४४ पण पहा.). अन्य जातीला हे आशीर्वाद येशू नावाच्या एका यहुदीमध्ये प्राप्त झाले. आपल्या आईद्वारे तो इशया आणि दाविदाच्या घराण्यामधून आला. जसे की मीखा ५:२ मध्ये भविष्यवाणी केल्या गेली, त्याचा जन्म बेथलेहेममध्ये झाला. जसे की स्तोत्रसंहितामध्ये भविष्यवाणी केल्या गेली होती, तो मरणातून जिवंत झाला. त्याने प्रेषितांची कृत्ये दुसऱ्या अध्यायामध्ये यहुदी पेन्टेकॉस्टच्या सणाच्या दिवशी आपल्या सार्वकालिक राज्य अर्थात मंडळीची स्थापना केली. पहिले तो यहुद्यांना आणि मग अन्य जातीला बोलावीत आहे की त्याच्या सुवार्तेला मानावे आणि तारण प्राप्त करून स्वर्गीय लोक बनावे (रोमकरास पत्र १:१६, ६:३-४, प्रेषितांची कृत्ये २:३८)

### गर्दीपासून वेगळे होऊन चला....कारण

''...तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यास म्हणेल, अहो माझ्या पित्याचे आशीर्वादीतहो, या, जे राज्य जगाच्यापासून तुम्हाकरिता सिद्ध केले आहे ते वतन घ्या, कारण मी भूकेला होतो तेव्हा तुम्ही

• • •




# पवित्र शास्त्राचे शब्द तुमचे सामर्थ्य वाढविण्यास सहाय्यक

- फैंटर डी. नार्दर्न

**पे**त्राचे पहिले पत्र १:१-५ ''पेत्राकडून जो येशू ख्रिस्ताचा प्रेषित आहे त्या परदेशीयाच्या नावे जे पंत, गलतिया, कप्पदुकिया आशिया व बिथुनिया ह्यात यहुदी लोकातील देवपित्याच्या पूर्वज्ञानानुसार आत्म्याच्याद्वारे होत असलेल्या पवित्रकरणात राहण्यासाठी व त्यांच्यावर येशू ख्रिस्ताच्या रक्ताचे सिंचन होण्यासाठी निवडलेले जे परदेशवासी आहेत, त्यांना येशू ख्रिस्ताचा प्रेषित पेत्र ह्याच्याकडून तुम्हाला कृपा व शांती विपुल मिळोत. आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव पिता धन्यवादीत असो. जिवंत आशा प्राप्त होण्यासाठी आणि अविनाशी निर्मळ व अक्षय वचन मिळविण्यासाठी त्याने आपल्या महादयेनुसार येशू ख्रिस्ताच्या मृतातून पुनरूत्थानाच्याद्वारे आपल्याला पुन्हा जन्म दिला. जे तारण शेवटच्या काळी प्रगट होण्यास सिद्ध आहे, ते प्राप्त व्हावे म्हणून जे तुम्ही

देवाच्या शक्तीने विश्वासाच्या योगे रक्षिलेले आहा, त्या तुम्हासाठी ते वतन स्वर्गात राखून ठेवले आहे.''

खाली दिलेल्या वचनामध्ये प्रयुक्त शब्दाचे अर्थ दिले आहेत, आशा आहे की ते हे उदाहरण समजून सांगण्यासाठी सहाय्यक होतील.

**१) परदेशवासी (यू: Parepidemos)** एखाद्या परक्या देशात राहणारे लोक. परमेश्वराचे लोक आपल्या अनंत निवासामध्ये जाणाऱ्या रस्त्यामध्ये जगात प्रवासी आहेत. आपले नागरिकत्व स्वर्गात आहे.

**२) पांगलेले (यू: doas[pra)** देशामध्ये पसरून. परमेश्वराचे लोक ज्याही देशात राहतात ते तेथे विश्वासू आहेत.

**३) निवडलेले, निवडल्या गेलेले (यू: eklektos)** (परमेश्वराद्वारे) निवडलेले. आपल्या कृपेने परमेश्वर विश्वास करणाऱ्यांना, आपला आशीर्वाद देण्यासाठी निवडतो.

**४) आज्ञांकित (यू: kata)** आधीन, मोठ्यापासून लहानापर्यंत विश्वास करणे, निवडल्यावर विश्वासू लोक परमेश्वराचे पूर्वज्ञान आणि इच्छेच्या अधीन सेवा करतात.

**५) पूर्वज्ञानानुसार (यू: prognosis)** भविष्याची माहिती होणे, विश्वास करणाऱ्या सर्व लोकांच्या भविष्याची परमेश्वराला आधीपासून माहिती आहे. पहा (मार्क १६:१५,१६)

**६) आत्म्याच्याद्वारे (यू: en)** परमेश्वराने आपल्या वचनाची आज्ञा पाळणाऱ्यासाठी तारण आणि पवित्र केल्या जाणे ठरविले आहे.

**७) पवित्र करणे (यू: hagiasmo)** शुद्ध आणि वेगळे केलेला. आज्ञाधारक विश्वासू लोकांना जगाच्या अशुद्धतेपासून येशूच्या रक्तामध्ये आपल्या विवेकाला धुवून घेतल्यास वेगळे केल्या जाते.

**८) च्यासाठी (यू: eis)** त्यासाठी त्या दिशेमध्ये प्राप्त करण्याचे लक्ष.

शुद्ध झाल्यावर विश्वासू लोकांना त्या समुहामध्ये पाठविल्या जाते जे त्याच्या वचनाच्या गोष्टींना मानतात.

**९) आज्ञा मानणे (यू: hupakoe)** आपल्या स्वत:ला कोणा दुसऱ्याच्या अधिकारामध्ये देणे. वरिष्ठ अधिकाऱ्याच्या आज्ञेमध्ये राहण्याचा सल्ला देत या शब्दाचा उपयोग सैनिक या अर्थामध्ये केला जात होता.

**१०) आशा (यू: elpis)** तारणाची आनंददायी आणि आत्मविश्वासाची आशा. ज्या प्रकारे एखाद्या कुटुंबामध्ये नवीन बाळाच्या जन्माची तयारी करत त्याच्यासाठी खोली तयार करणे आणि त्याच्यासाठी कपडे विकत घेणे आनंदाची जाणीव करते तसेच आपल्या तारणाची तयार करत एका ख्रिस्ती व्यक्तीची जीवंत आशा काम करते.

**११) निर्मळ (यू: amarantos)** डाग नसलेले स्वच्छ. वारसामध्ये मिळालेले ते स्थान कधीच घाणेरडे होणार नाही आणि परमेश्वराच्या उपासनेमध्ये त्यांना जाण्यासाठी काहीच अडखळण नाही.

• • •

येशू देवाचा पुत्र आहे असा विश्वास जो धरतो त्याच्यावाचून जगावर जय मिळविणारा कोण आहे?
(१ योहान ५:१-५)

# पाप काय आहे ?

- जिम सुधीत

**पा**प काय आहे? आज कदाचितच कोणी याची गोष्ट करत असेल. याशिवाय लोकांची स्थिती ''आजारी'' किंवा ''रोगी'' दाखवल्या जाते.

परंतु पाप समाप्त झाले. वास्तविक जगाच्या सहिष्णु आणि अनुमोदक व्यवहाराने पापाला प्रोत्साहन मिळाले आहे आणि हे इतके वाढलेले आहे की मनुष्याच्या हृदयाला कर्करोगासारखा खात आहे.

पाप काय आहे? ''जो कोणी पाप करितो तो स्वैराचार करितो, कारण पाप स्वैराचार आहे'' (योहानाचे पहिले पत्र ३:४). पाप केवळ सरकारी कायद्याला तोडणे नाही. (रोमकरास पत्र १३:१,२). परंतु जसे की, पवित्र शास्त्रात लिहिले आहे, पाप परमेश्वराच्या नैतिक आणि आत्मिक नियमांना तोडने पण आहे. मनुष्याच्या अस्तित्वाच्या आरंभापासूनच हे नैतिक आणि आत्मिक नियम बरोबर आहेत.

परमेश्वर खोटे बोलणे, चोरी करणे, आळस, व्यभिचार, समलैंगिकता आणि अन्य अनैतिकता, लोभ, शोषण, हत्या यांची मनाई करतो आणि या सर्वांना म्हणतो, ''परंतु भेकड, विश्वास न ठेवणारे, अमंगळ, खून करणारे जारकर्मी, चेटकी, मूर्तीपूजक व सर्व लबाड बोलणारे माणसे ह्याच्या वाट्यास अग्नीचे व गंधकाचे सरोवर येईल हेच ते दुसरे मरण आहे'' (प्रकटीकरण २१:८).

• • •



# पवित्रशास्त्र अध्ययन

**- टॉम कैल्टन**

**तु**म्ही पापाशी झगडून परेशान आहात काय? तुमचा पराजय तुमच्या विजयापासून मोठे आहे का? अडखळणं हे आहे की तुम्ही चुकीचे शस्त्र घेऊन झगडत असाल किंवा तुम्ही पापावर तोपर्यंत विजय मिळवू शकत नाही जोपर्यंत तुम्ही याचा सामना परमेश्वराच्या शस्त्र घेवून करत नाही.

इफिसकरास पत्राच्या सहाव्या अध्यायात दाखविलेले सर्व शस्त्र वाचविण्यासाठी आणि रक्षण करण्यासाठी ज्यामध्ये एकच शस्त्र हल्ला करण्यासाठी आहे, ''आत्म्याची तरवार जे परमेश्वराचे वचन आहे'' (वचन १७).

परीक्षा आणि पापाला कोण हरवू शकतो? शेवटी परमेश्वराचे वचनच आहे जे त्याला हरवू शकते. स्तोत्रकर्त्याने लिहिले आहे ''मी तुझ्याविरुद्ध पाप करू नये म्हणून मी आपल्या मनात तुझे वचन जपून ठेविले आहे'' (स्तोत्रसंहिता ११९:११). हे समजून की पवित्रशास्त्र पापाच्या

विरुद्ध एक जबरदस्त शस्त्र आहे. जितके आपण सत्य समजून घेऊ तितकीच आम्हाला पापाविरुद्ध लढायला शक्ती मिळेल.

कॉम्प्युटरवर काम करणारे लोक सहज रितीने GIGO चा उपयोग करतात. ज्याचा पूर्ण अर्थ ''गाब्रेज इन गाब्रेज आऊट'' आहे. कॅम्प्युटरमध्ये जे काही टाकल्या जाते त्यामधून तेच मिळू शकते. कॅम्प्युटरची प्रत्येक, बिघाड वास्तविक त्याच्या त्याच्या प्रोग्रामची बिघाड होते. जर तुम्ही यामध्ये चुकीची माहिती किंवा चुकीचे निर्देश टाकाल तर तुम्हाला याचे चुकीचे परिणामच मिळतील.

तीच गोष्ट आमच्या बुद्धीची, मनाची आहे. ज्याही गोष्टीला तुम्ही तुमच्या विचारात भरता तसाच तुमचा व्यवहार दिसू लागतो, नितीसूत्रे २३:७ याला याप्रकारे म्हणतो, ''कारण तो आपल्या मनात घास मोजणाऱ्यासारखा आहे.'' आपल्या मनाला परमेश्वराच्या वचनाच्या सत्याने भरून घेतल्याने तुमचा व्यवहार पवित्र आणि भक्तिपूर्ण, भक्तीने भरलेला होऊन जाईल. जर तुम्ही तुमच्या मनाला दुसऱ्या गोष्टींनी भराल तर तसेच फळ मिळेल. मार्क ७:२१-२३ मध्ये परमेश्वराच्या सत्यतेला न भरणाऱ्या मनाच्या परिणामाला येशूने दाखवले आहे. ''कारण आतून म्हणजे माणसाच्या अंत:करणातून वाईट विचार निघतात; जारकर्म, चोऱ्या, खून, व्यभिचार, लोभ, दुष्टपणा, कपट, कामातूरपणा, हेवा, शिव्यागाळी, अहंकार, मूर्खपणा, ह्या सर्व वाईट गोष्टी आतून बाहेर निघतात व माणसाला भ्रष्ट करितात.''

• • •

# येशू ख्रिस्ताचा वधस्तंभ

**- हैस जे. डेडरसेक**

**पौ**ल या तथ्यावर जोर देतो की, वधस्तंभाच्या गोष्टींना ''ते ह्या युगातल्या अधिकाऱ्यातील कोणालाही कळले नव्हते, कारण यांना ते कळले असते तर त्यांनी गौरवाच्या प्रभूला वधस्तंभावर खिळले नसते'' (करिंथकरास पहिले पत्र २:८). येथे येशूच्या वधस्तंभाला सार्वभौतिक महत्त्व म्हणून दाखविण्यात आले आहे. परमेश्वराची बुद्धी सुटकेच्या योजनेत प्रगट केल्या गेलेली आहे. ज्यामध्ये येशू ख्रिस्ताचा मृत्यू ही निर्णायक घटना आणि तिचे पूर्ण होणे जे विश्वास ठेवलेल्यांना महिमा आणि आपल्या परिपूर्णतेत ईश्वरीय जीवन देणारे आहे.

पौलाचे कलस्सैकरास पत्र २:१४ मध्ये येशूच्या वधस्तंभाच्या प्रभावाला याच प्रकारे दाखविण्यात आले आहे. ''आपल्या विरुद्ध असलेले म्हणजे आपल्याला प्रतिकूल असलेले विधीचे ऋणपत्र त्याने खोडले व वधस्तंभाला खिळून त्याने ते रद्द केले.''

येशूने म्हटले, ''जर कोणी माझा अनुयायी होऊ पाहतो तर त्याने आत्मत्याग करावा. आपला वधस्तंभ उचलून घ्यावा व मला अनुसरत राहावे'' (मार्क ८:३४). आणि त्याला आपला वधस्तंभ उचलणे आवश्यक आहे (मत्तय १०:३८). (लूक १४:२७). पौल येशूच्या वधस्तंभाशिवाय दुसऱ्या गोष्टीमध्ये अभिमान मानत नव्हता (गलितकरास पत्र ६:१४). कारण त्याच्या सामर्थ्याने तो नवी उत्पत्ती बनला (गलतिकरास पत्र ६:१५). वधस्तंभावर खिळलेल्या, टांगलेल्या येशू ख्रिस्तामध्ये विश्वास ठेवणाऱ्यांसाठी व्यवस्थेनी पापापासून शरीराशी संबंध तोडणे आवश्यक आहे. जे ख्रिस्त येशूचे आहेत त्यांनी विकार व वासना ह्यांच्यासह देहस्वभाव वधस्तंभावर खिळला आहे (गलतीकरास पत्र ५:२४). त्याच्यासाठी बाप्तिस्मा येशूच्या मृत्यूमध्ये त्याच्या भागीदारीचे प्रतिक होते. हे आपल्याला ठाऊक आहे की हे पापाच्या आधीन असलेले शरीर नष्ट होऊन आपण ह्यापुढे पापाचे दास्य करू नये, म्हणून आपल्यातील जुना मनुष्य त्याच्याबरोबर वधस्तंभावर खिळला गेला (रोमकरास पत्र ६:६). यासाठी आम्हाला पूर्ण रितीने आज्ञा मानून आत्म्याच्या सामर्थ्याने जगायला पाहिजे (गलतीकरास पत्र ५:२५). पौल या गोष्टीला मानत होता की, मध्यस्थ हा एकाचा नसतो आणि देव तर एकच आहे (गलतीकरास पत्र ३:२०).

• • •

## फक्त एक वेळेस

- मॅल्कोम जेम्स मेक्लॉड

**या** जगातून मी फक्त एक वेळेस जाईल. यासाठी कोणताही चांगुलपणा, जो मी करू शकतो किंवा कोणतीही दया जी कोणत्या मानवीय जीवावर दाखवू शकतो, मला आता दाखवू द्या. मी याला टाळणे किंवा कानाडोळा करू इच्छित नाही कारण येथून मी दुसऱ्यांदा जाणार नाही.

आपल्या अंत:करणाला द्वेषापासून आणि आपल्या मनाला चिंतेपासून दूर ठेवा. साधे जीवन व्यतीत करा , अपेक्षा कमी ठेवा, गीत अधिक गात रहा, प्रार्थना निरंतर करा. आपल्या जीवनाला प्रेमाने भरा. सूर्याचा प्रकाश पसरून टाका, स्वत:ला विसरून जा. दुसऱ्यांबद्दल विचार करा. तसा व्यवहार करा की जसा तुम्ही इच्छिता, जसा तुमच्याबरोबर केल्या जावा.

संतुष्टीच्या सोन्याच्या साखळीच्या या पारखलेल्या कड्या आहेत.

• • •



# तारण मिळण्यासाठी मी काय करू ?

- जे.सी.चोट

**को**णी जर जीवनामध्ये काही बनण्याची इच्छा धरेल किंवा नैतिक रूपामध्ये कितीही चांगला असेल परंतु तारण मिळण्यासाठी मी काय करू? या प्रश्नाचा सामना त्याला करावाच लागेल आणि या गोष्टीला मानावेच लागेल.

पौल म्हणतो की, ''मनुष्य पापी आहे. (रोमकरास पत्र ३:२३, ५:८) जोपर्यंत तो आपल्या मागील पापासाठी पश्चात्ताप करणार नाही तर त्याचे तारण होऊ शकत नाही. या कारणाने त्याला क्षमेच्या प्रभूच्या अटीला मानणे आवश्यक आहे. तारणाला प्राप्त करण्यासाठी परमेश्वराने आपल्या पुत्राला मरावयास पाठविले (योहान ३:१६,१७). येशूने आपले रक्त सांडले यासाठी की आपल्याला आपल्या पापापासून क्षमा मिळावी. (पौलाचे इफिसकरास पत्र १:७)

परंतु तारण मिळण्यासाठी मी काय करू ? काही केल्या जाऊ शकते काय? जर होय, तर काय ? या प्रश्नाचे उत्तर देण्याची रीत

प्रभूच्या शब्दांमध्ये आहे. येशूने म्हटले ''जो विश्‍वास धरितो व बाप्तिस्मा घेतो त्याचे तारण होईल, जो विश्‍वास धरीत नाही तो शिक्षेस पात्र ठरेल.'' (मार्क १६:१६) पुन्हा येशूने म्हटले, ''आणि त्याने त्याला म्हटले असे लिहिले आहे की, ख्रिस्ताने दु:ख सोसावे, तिसऱ्या दिवशी मेलेल्यातून उठावे'' (लूक २४:४६). येशूने पुढे म्हटले की, जर आपली इच्छा आहे की पित्यासमोर मला स्वीकारावे तर आपल्याला ही लोकांसमोर त्याला स्वीकारण्याची अत्यंत आवश्यकता आहे (मत्तय १०:३२).

या प्रश्‍नाचे उत्तर देण्याचा आणखी एक पद्धत आहे ती म्हणजे परमेश्‍वराची प्रेरणा प्राप्त झालेल्या लेखकांजवळ जाणे. पौलाने म्हटले ह्याप्रमाणे विश्‍वास वार्तेने व वार्ता ख्रिस्ताच्या वचनाच्याद्वारे होते (रोमकरास पत्र १०:१७). इब्रीलोकास पत्राच्या लेखकाने (लेखक अज्ञात) घोषणा केली की ''आणि विश्‍वासावाचून त्याला संतोषविणे अशक्य आहे'' (इब्रीलोकास पत्र ११:६). नंतर पेत्राने घोषणा केली ''पश्‍चात्ताप करा आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून तुम्ही प्रत्येक जण येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्या, म्हणजे तुम्हाला पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल'' (प्रेषितांची कृत्ये २:३८). शौलाने हे विचारल्यावर की त्याने काय करावे, त्याला सांगण्यात आले की, तर ''आता उशीर का करतोस? ऊठ, त्याच्या नावाचा धावा करून बाप्तिस्मा घे आणि आपल्या पापाचे क्षालन कर'' (प्रेषितांची कृत्ये २२:१६).

प्रेषितांची कृत्ये २, ३, ८, ९, १६ आणि आणखी दिलेल्या प्रेषितांच्या अध्यायामध्ये आढळणाऱ्या अकरा मनपरिवर्तनाच्या घटनेवर लक्ष द्या. प्रत्येक घटनेमध्ये तुम्हाला आढळेल की सुवार्ता सांगण्यात आली आणि सुवार्ता सांगणाऱ्यांनी विश्‍वास धरला. आपल्या पापासाठी पश्‍चात्ताप केला. प्रभूमध्ये आपल्या विश्‍वासाचा स्वीकार केला आणि पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेतला.

तारणाच्या अटींना सोपे बनविण्यासाठी आणि आपल्याला सहज रूपामध्ये त्या समजण्यासाठी सहाय्य करायला आज्ञेच्या पायऱ्याबद्दल सांगितले आहे.

**पायरी १ - सुवार्ता ऐकणे, वचन ऐकणे.**

**२ - वचनावर सुवार्तेवर विश्वास ठेवणे.**

**३ - पश्चात्ताप करणे.**

**४ - येशूला देवाचा पूत्र म्हणून स्वीकार करणे.**

**५ - पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेणे.**

पुढे सविस्तर हे सांगितले आहे की या पायऱ्या मनुष्याला येशूमध्ये आणि त्याच्या मंडळीत ठेवतात, जेथे पापापासून त्याचे तारण होते (करिंथकरास पहिले पत्र १२:१३, कलस्सैकरास पत्र २:१४, गलतीकरास पत्र ३:२६,२७)

तारणाला समजण्यासाठी आणखी एक बाब म्हणजे नवीन जन्म किंवा आत्मिक जन्म दाखविला आहे. जे प्रभूची आज्ञा पाळण्याच्या वेळेस होते(योहान ३:३-५). जेव्हा सत्याला जे की परमेश्वराचे वचनाचे बी आहे, कोणाच्या हृदयात पेरल्याने, त्याला ग्रहण केल्या जाते, जे व्यक्तिला येशूमध्ये नवीन उत्पत्तीच्या रूपात पुढे येण्यासाठी पाण्यामध्ये डुबकी अर्थात बाप्तिस्म्याकडे घेऊन जातो. तर तो पाण्याने आणि आत्म्याने जन्म घेतो (योहान ४:५, रोमकरास पत्र ६:३,४ करिंथकरास दुसरे पत्र ५:१७).

पवित्रशास्त्र सांगते की, येशू वधस्तंभावर मरण पावला, कबरेमध्ये पुरल्या गेला आणि मरणातून तिसऱ्या दिवशी जिवंत झाला. करिंथकरास पहिले पत्र १५:१-४, रोमकरास पत्र ६:१७,१८ मध्ये पौल म्हणतो की, आपल्या पापासाठी मरून बाप्तिस्म्याच्या पाण्यामध्ये त्याच्याबरोबर पुरल्या

जाणे आणि नवीन जीवन जगण्यासाठी पाण्याच्या  कबरेमधून उठविल्या गेल्यावर आणि ते शिक्षण मान्य केल्यावर मग आम्ही त्याच्या वचनात एक पक्के होऊन जातो. प्रभूच्या आज्ञेला मानून आज्ञापालनाच्या कामामध्ये आपण म्हणू की, आम्ही येशूचा मृत्यू, गाडल्या जाणे आणि जिवंत होण्यावर विश्वास ठेवितो आणि सांकेतिक रूपात त्याचा मृत्यू, गाडल्या जाणे आणि जिवंत होण्यालाच दाखवत राहतो. रोमकरास पत्र ६ वा अध्याय ध्यानपूर्वक वाचावा.

तर मग कोणाचे तारण होऊ शकते ? जो समजण्याइतका मोठा आहे की, तो सत्य ऐकून समजू शकेल आणि पूर्ण मनाने याला मानून आपल्या पापापासून वळेल, लोकांसमोर येशूला परमेश्वराचा पुत्र मानुन आणि आपल्या पापाच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घेईल, त्याचेच तारण होऊ शकते.

परंतु मग परमेश्वराची कृपा कोठे गेली ? पौल म्हणतो की कारण कृपेनेच विश्वासाच्याद्वारे तुमचे तारण झालेले आहे आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही तर हे देवाचे दान आहे. (इफिसकरास पत्र २:८,९) याचा अर्थ आहे की तारण प्रभूने दिले आहे आणि आपल्या विश्वासाच्याद्वारे आमच्यासाठी आज्ञा पाळणे आवश्यक आहे, याद्वारे आमचे तारण होऊ शकेल. शेवटी आमचे तारण, जर खरोखरच आमचे होते तर ते देवाच्या कृपेनेच होते. कारण आपल्या चांगल्या कामाद्वारे तारण पावण्याच्या योग्यतेला कमवू शकत नाही. याबरोबरच आम्हाला स्मरण असायला पाहिजे की परमेश्वराची कृपा आम्हाला वाचवू शकत नाही, जर आपण त्याच्या आज्ञा पाळण्यासाठी मनाई करतो.

• • •



# पवित्र आत्मा कोण आहे ?

- जे.सी.चोट

"पवित्र आत्मा" हा विषय खूप महत्त्वाचा आहे. कारण पुष्कळ जण तो आणि त्याचे कार्य याबाबत गोंधळात आहेत. बहुतेक जगाने त्यास एकत्रितरित्या स्वीकारले नाही तर उर्वरित अत्यंत विरोधात्मक शिकवितात की पवित्र आत्मा आज चमत्कारिकरित्या काम करतो पण पवित्र शास्त्र काय सांगते ?

बायबल सांगते की, पवित्र आत्मा हा एक व्यक्तिमत्व देवाच्या रूपाची तिसरी व्यक्ती आहे. देव आणि ख्रिस्त यांच्यासोबत तो शाश्वत आहे, होता आणि असेल. जुन्या करारातील निर्मिती आणि सर्व महान गोष्टीत, घटनेत त्याचा सहभाग होता. या पाठात आम्हास त्याच्या ख्रिस्त आणि प्रेषितांच्या काळातील कार्याविषयी शिकायचे आहे.

मागे वळून येशू ख्रिस्ताचा जन्म जर पाहिला तर नोंदीप्रमाणे "येशू ख्रिस्ताचा जन्म ह्याप्रकारे झाला. त्याची आई मरिया हिचे योसेफास वाग्दन झाल्यावर त्याचा सहवास होण्यापूर्वी ती पवित्र आत्म्यापासून

गर्भवती झालेली दिसून आली. तिचा पती योसेफ नीतिमान होता व तिची बेअब्रू करण्याची त्याची इच्छा नसल्यामुळे तिला गुप्तपणे सोडण्याचा त्याने विचार केला असे विचार त्याच्या मनात घोळत असता पाहा, प्रभूच्या दुताने त्याला स्वप्नात दर्शन देऊन म्हटले,

योसेफा, दाविदाच्या पुत्रा, तू मरियेचा आपली पत्नी म्हणून स्वीकार करण्यास अनमान करू नकोस. कारण तिच्या पोटी जो गर्भ आहे तो पवित्र आत्म्यापासून आहे. तिला पुत्र होईल आणि त्याचे नाव तू येशू असे ठेव. कारण तोच आपल्या प्रजेला त्यांच्या पापासून तारील.

हे सर्व अशासाठी झाले की, प्रभूने संदेष्ट्याच्याद्वारे जे सांगितले ते पूर्ण व्हावे; ते असे-पाहा कुमारी गर्भवती होईल व तिला पुत्र होईल आणि त्याला इम्मानुएल हे नाव देतील; ह्या नावाचा अर्थ 'आम्हाबरोबर देव'.

तेव्हा झोपेतून उठल्यावर त्याने प्रभूच्या दुताने आज्ञापिल्याप्रमाणे केले; त्याने आपल्या पत्नीचा स्वीकार केला तरी तिला पुत्र होईपर्यंत त्याने तिला जाणले नाही; त्याने त्याचे नाव येशू असे ठेविले''(मत्तय १:१८-२५).

कृपया या सर्व गोष्टीमधील पवित्र आत्म्याची भूमिका लक्षात घ्या. हा पवित्र आत्माच होता ज्याने यशया संदेष्ट्यास हे लिहिण्यास प्रोत्साहित केले. ''यास्तव प्रभू स्वत: तुम्हास चिन्ह देत आहे; पाहा कुमारी गर्भवती होऊन पुत्र प्रसवेल व त्याचे नाव इम्मानुएल (आमच्या सान्निध देव) असे ठेवील''(यशया ७ :१४). पुढे मरिया मुलासोबत आढळते ते या स्पष्टीकरणासोबत की ती पवित्र आत्म्यापासून गर्भवती झाली. शेवटी हे सर्व यासाठी झाले, कारण परमेश्वर संदेष्ट्याद्वारे जे बोलला की कुमारी पुत्रास जन्म देईल त्याचे नाव इम्मानुएल म्हणजे आम्हाबरोबर देव असे असेल हे पूर्ण व्हावे.

लुक अध्याय १ प्रमाणे, जखऱ्या आणि अलिशिबा यांना सुद्धा पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने मूल झाले. या घटनेत वांझ स्त्री गर्भवती झालेली आहे. या मुलाचे नाव योहान जो नंतर बाप्तिस्मा करणारा योहान या नावाने ओळखला गेला. कारण तो अशा लोकांचा बाप्तिस्मा करीत असे, जे परमेश्वराच्या मर्जीप्रमाणे शरण जात असत किंवा वागत असत. ख्रिस्ताचा निरोप्या ज्यास परमेश्वराचा मार्ग सिद्ध करण्यास पाठवलेले होते तो म्हणाला मी पाण्याने तुमचा बाप्तिस्मा पश्चात्तासाठी करतो खरा परंतु माझ्या मागून जो येत आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे. त्याच्या वाहणा उचलून चालण्याची देखील माझी पात्रता नाही; तो पवित्र आत्म्याने व अग्नीने तुमचा बाप्तिस्मा करणार आहे. त्याच्या हातात त्याचे सूप आहे, तो आपले खळे अगदी स्वच्छ करील व आपले गहू कोठारात साठवील, पण भूस न विझल्या अग्नीने जाळून टाकील.

तेव्हा योहानाच्या हातून बाप्तिस्मा घेण्याकरिता येशू गालीलाहून यार्देनेवर त्याच्याकडे आला; परंतु योहान त्याला मना करीत म्हणाला, आपल्या हातून मी बाप्तिस्मा घ्यावा असे असता आपण माझ्याकडे येता हे काय? येशूने त्याला उत्तर दिले, आता हे होऊ दे कारण ह्या प्रकारे सर्व धर्माचरण पूर्णपणे करणे हे आपणाला उचित आहे तेव्हा त्याने तसे होऊ दिले.

मग बाप्तिस्मा घेतल्यावर येशू लागलाच पाण्यातून वर आला आणि पाहा, आकाश उघडले तेव्हा त्याने परमेश्वराचा आत्मा कबुतरासारखा उतरतांना व आपणावर येतांना पाहिला आणि पाहा, आकाशातून अशी वाणी झाली की हा माझा 'पुत्र' मला परमप्रिय आहे. ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे''(मत्तय ३:११-१७).

ज्याप्रमाणे आपण आधी पाहिले की, मरियेस पवित्र आत्म्याद्वारे मूल प्राप्त झाले आणि येशू ख्रिस्ताने जगात जन्म घेतला आता एक प्रौढ

म्हणून आपण पाहतो की येशूने योहानाकडून बाप्तिस्मा घेतला (पाण्यात बुडून) स्वर्गीय पिता याद्वारे संतुष्ट झाला. देवाचा आत्मा येशूवर उतरला आणि देव म्हणाला, हा माझा परमप्रिय पुत्र, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे.

मत्तय ४:१ आम्हास सांगते, ''तेव्हा सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला अरण्यात नेले'' सैतानाच्या आव्हानास व मोहास येशू कसा सामोरा गेला ? त्याने प्रत्येक वेळी पवित्र शास्त्रातील लेखाद्वारे उत्तर दिले. हे पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने लेखकांनी लिहिले आहे.

आम्ही योहान ३:३४ मध्ये वाचतो की, ख्रिस्ताला आत्मा हा मोजून, मापून मिळाला नव्हता तर पवित्र आत्म्याचे पूर्ण सामर्थ्य, जगात जे कार्य करण्यासाठी तो आला होता ते पूर्ण करण्याची पात्रता त्यास मिळाली होती. ह्या विधानानुसार विरोधात्मक बाजू म्हणजे इतरांना आत्मा मोजून मापून किंवा ते जे आत्म्याच्या सामर्थ्याद्वारे करीत त्यामध्ये मर्यादा होत्या.

ख्रिस्ताने जाण्यापूर्वी त्यास सादर करण्यासाठी आणि त्याचे कार्य पुढे नेण्यासाठी बारा माणसे निवडली. ज्यास प्रेषित म्हटले गेले. प्रेषित म्हणून घ्यावयाची पात्रता म्हणजे तो ख्रिस्तासोबत त्याच्या कार्यापासून ते पुनरूत्थानापर्यंत असायला हवा. पुनरूत्थित देव म्हणून त्याला स्वर्गीय पित्याकडे परत जाणे होते. येशूने त्याच्या शिष्यास (प्रेषितांस) सांगितले, ''तरी मी तुम्हाला खरे ते सांगतो; मी जावे हे तुमच्या हिताचे आहे कारण मी न गेलो तर कैवारी तुमच्याकडे येणारच नाही'' (योहान १६:७). तो पुन्हा सांगतो, ''तरी ज्याला पिता माझ्या नावाने पाठवील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व काही शिकवील आणि ज्या गोष्टी मी तुम्हाला सांगितल्या त्या सर्वांची तुम्हास

आठवण करून देईल'' (योहान १४:२६).

येशूने वचन दिल्याप्रमाणे तो कैवारी म्हणून पवित्र आत्मा अनेक गोष्टी करू शकला. पवित्र आत्म्यात जेव्हा प्रेषितांनी बाप्तिस्मा घेतला (प्रेषित २ प्रमाणे) तो त्यावर वर्षाव करून, त्यांना सत्यात चालवेल, ख्रिस्ताने त्यांना जे शिकविले होते त्याची आठवण करून देईल आणि त्यांना देवाने पाठवले हे लोकांना कळावे म्हणून ते अनेक चमत्कार करतील.

परंतु प्रेषितांना सर्व कार्य करणे शक्य नव्हते, म्हणून देवाने त्यांना सामर्थ्य दिले की निवडलेल्या शिष्यांवर त्यांनी हात ठेवल्यास शिष्यास देखील पवित्र आत्म्याचे सामर्थ्य प्राप्त होईल. जसे प्रेषितांना हे शक्य होते पण ज्या शिष्यांनी हे पवित्र आत्म्याचे दान स्वीकारले ते हे चमत्काराचे सामर्थ्य दुसऱ्यांना देऊ शकत नव्हते.

सरते शेवटी प्रेषित २:३८ प्रमाणे पाण्याच्या बाप्तिस्म्याच्या वेळेस, पापक्षालनाच्या वेळेस, इतरांनी सामान्य, चमत्कारिक नसलेला, मोजून, मापून पवित्र आत्मा स्वीकारला.

आम्ही आपणास आत्म्याचे वचन ऐकण्यासाठी उत्तेजन देऊ इच्छितो. परमेश्वराने ज्या गोष्टी सांगितल्या, देवावर विश्वास ठेवणे, आपल्या पापाबद्दल पश्चात्ताप करणे, ख्रिस्त हा परमेश्वराचा पुत्र आहे अशी कबुली देणे व बाप्तिस्मा घेऊन पुन्हा पाप न करणे, जेव्हा तुम्ही हे करता तेव्हा तो तुम्हास वाचवितो, त्याच्या मंडळीत तुमचा समावेश करतो, तुम्हास पवित्र आत्मा देतो (प्रेषित २:३८, ४७).

(जे.सी.चोट यांनी ६० वर्षे देवाची सुवार्ता गाजवली. उर्वरित आयुष्य त्यांनी आशियातील मिशन कार्यासाठी दिले.)

• • •

आम्ही तुम्हाला विभिन्न भाषांतील सुवार्ता घोषणेच्या प्रयत्नामध्ये लांभांकित व्हावे ह्यासाठी उत्तेजन देत आहोत.

**T.V./ Radio Program/ Magazine / Bible Courses**

**GRACIOUS WORD** **TAMIL**

Speakers : **Philemon & Kingsly Rajah**
T.V. Program : **Nambikki TV-** Friday 6-15 a.m.
**Tamilan TV-** Sunday 6-45 a.m.
Magazine : Kirubaiyulla Vaarthai (Monthly Tamil)
The Voice of Truth Intl. (English Qtly.)
Bible corres.Course : Basic and Advanced Bible
**Correspondence Courses (Tamil & English)**
**J.C. School Of Evangelism** : Training faithful men and women for Evangelism @ their Place

Online Bible Course@ : **www.graciousword.org.(Tamil&English)**

**God's word to the Visually Challenging People**

-The Voice of Truth International Braille Edition,Tamil& English-Free
- Braille Bible Lessons, Tamil& English-Free
- Free MP3 Player Audio Bible for Blinds,Different Languages-Free

**For more information and Bible Course, write to**

Church of Christ, Post Box 15, Arasaradi, Madurai-625016.
Tamilnadu (India) Cell : 92 4421, 4421, 92 4431 4431
Email : obey2jesus@gmail.com Visit : www.graciousword.org

---

**SATHYA VAZHI**

Speakers : **P.R. Swamy (Evangelist)**
Radio Program : Sunday to Wednesday 5.30 p.m.
Srilanka All Asia Service-25 & 49 Meter band
Magazine : Sathya Vazhi (Tamil)
Programs : Bible School & Bible Corres. Courses

**For more information write to**
**"Sathya Vazhi",** Post Box 8405, Bengaluru - 560 084
Phone : 080-25463507 Cell : 098440 70763
Email : prsdoug@hotmail.com

**THIRUMARAI AASAN**

Speaker : **Rajanayagam**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday 7.00 a.m.
Thursday 9.30 p.m. & Saturday 7.15 a.m.
Magazine : Thirumarai Aasan (Monthly)
Tamil Qtrly Magazine : "Sathiyathin Kural" (TVOTI- Tamil)
Advanced Bible Correspondence Course Available in Tamil

**For more information write to**
**Church of Christ,** Post Box 27, Dharapuram Road,
Kangeyam - 638701 Cell : 9842730382

**THE WORD OF CHRIST**

Speaker : **B. Arjunan**
T.V. Program : **Tamilan T.V.**-Monday,Saturday7.30 -7.45a.m.
Magazine : The word of Christ (Monthly)
Radio Program : SW25 & 41m (Saturday 5.30 to 5.45 p.m.)
Srilanka All Asia Service

**For more information write to**
**The Word of Christ,** Post Box 5, Batlagundu - 624206.
Dindigul Dist. Cell : 9443558041

**SATYAVANI**

**TELUGU**

Speakers : **Joshua & Ricky Gootam**
T.V. Program : **Subhavartha Channel** Sunday 6.00 p.m.
**Rakshana Channel**
Wednesday 6.30 p.m. Thursday 11.00 a.m.
Satyavani T.V. Online : www.sakthitv.in
Every Wednesday & Friday at 8.00 p.m.

**MALAYALAM**

Speaker : **P.K. Vargheese**
T.V. Program : **Jai hind Channel**
Every Saturday 6 a.m. to 6.30 a.m.
Magazines : Bible Truth - Monthly
& Truth for Today (Bi-monthly)

**For more information & Bible course write to**
**Church of Christ,** Tampuranmukku, Trivandrum- 695 035.
Phone : 0471 - 2303378, Cell : 9447035465

**HINDI**

| | | |
|---|---|---|
| T.V. Program | : | **Shubh Sandesh Hindi Channel**<br>Every Sunday, Tuesday 7.00 pm to 7.30 pm |
| Speakers | : | **Sunny/ Francis/ Vinay David** |
| Magazine | : | **English Bible Teacher - Sunny David**<br>E-mail : sunny_davidin@yahoo.co.in<br>Cell : 09810896789<br>**Hindi Bible Teacher - Francis David,**<br>Email : davidfrancis53@rediffmail.com<br>Cell : 09911916932 |
| Bible Courses | : | **Hindi & English - Vinay David**<br>Emai: vinay_david2002@yahoo.co.in<br>Cell : 09911719517 |
| Church meets at: | | C.R. Park, 1st block, Near Market<br>No. 4, New Delhi - 110019 |
| Sunday Worship: | | 11.00 a.m. |

**For more information write to :**
**Church of Christ,** Post Box 3815, New Delhi - 110049

**MARATHI**

**WORDS OF HOPE**

| | | |
|---|---|---|
| Speaker | : | **Amul Bansod** |
| T.V. Program | : | **MCN News Channel**<br>Monday, Wednesday, Friday<br>7.30 a.m. to 8.00 a.m. |

**For more information & Bible course write to**
**Aurangabad Church of Christ,** F/5 Siyon Nagar,
Pahadsingpura, Aurangabad. (MS) India
Mob. : 9049941066 / 9922262067

**BRALLE MAGAZINE & BRAILLE BIBLE COURSE** Available for Visually Challenging People in Tamil/English/ Telugu Languages.

Write to : **THE VOICE OF TRUTH INTERNATIONAL-BRAILLE EDITION**
P.O. Box : 15, ARASARADI, MADUARAI-625 016. TAMILNADU
Email : obey2jesus@gmail.com Ph.: 92 4421 4421

# व्हाईस ऑफ ट्रुथ इंटरनॅशनल
## फॉर्म

- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझ्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी व्हाईस ऑफ ट्रुथ (मराठी) माझा मित्र ...................... ह्याच्यासाठी मागवू इच्छितो / इच्छिते. मी चार अंकासाठी वर्गणी रू. १००/- चेक / मनीऑर्डरने पाठवित आहे. माझा पत्ता खाली दिला आहे.
- मी २५ प्रतींची वर्गणी रू. ५०० पाठवित आहे. ह्याप्रकारे पूर्ण मंडळीच्या लोकांसाठी ह्या प्रती मागवून तुम्ही प्रचार करण्यासाठी मदत करून आशीर्वाद प्राप्त करू शकता.

**कृपा करून ह्या फॉर्मला भरून चेक सोबत एका पाकीटामध्ये टाकून किंवा मनीऑर्डर सोबत खाली दिलेल्या पत्त्यावर पाठवून द्यावे. चेक/मनीऑर्डर खाली दिलेल्या नावाने पाठवावे.**

**Amul Dayanand Bansod**
**F/5 Siyon Nagar, Near D.K.M.M. College, Lani Road,**
**Pahadsingpura, Aurangabad - 431 001 (M.S.) India**

Name ..........................................................................................
Add ............................................................................................
....................................................................................................
City .......................... State ....................... Pin ..............................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.....................................................................................................
City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.....................................................................................................
City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.....................................................................................................
City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.....................................................................................................
City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..............................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..............................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..............................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................

Add ..........................................................................................

..............................................................................................

City .......................... State ....................... Pin ...............................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.................................................................................................
City ........................... State ........................ Pin ................................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.................................................................................................
City ........................... State ........................ Pin ................................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.................................................................................................
City ........................... State ........................ Pin ................................

Name ..........................................................................................
Add ..........................................................................................
.................................................................................................
City ........................... State ........................ Pin ................................

# व्हाईस ऑफ ट्रूथ इंटरनॅशनल

## तुम्ही ह्या पुस्तकाचे काय करू शकता :

- ह्याचा आपल्या कौटुंबिक अध्ययनात वापर करा.
- आठवड्याच्या दिवसामध्ये वचनातून शिकविण्यासाठी उपयोग करा.
- प्रतिक्षालयामध्ये ह्याच्या प्रति ठेवा जेथे काही वेळापुरते लोक थांबतात.
- कोणाला भेटल्यावर हे पुस्तक द्या.
- आपल्या सोबत ह्या प्रतींना ठेवा व आपल्या नातेवाईकांना व मित्रांना ह्या प्रती द्या.
- व्यक्तिगत अध्ययनामध्ये ह्याचा वापर करा.
- नर्सिंग होममध्ये, दवाखान्यामध्ये, जेलमध्ये, हॉटेलमध्ये, ऑफिसमध्ये, लायब्ररीमध्ये ह्या प्रती ठेवा.
- आजारी व्यक्तींना भेटायला गेल्यावर त्यांच्यासाठी ह्याच्या प्रती घेऊन जा.
- कोणाला हे पुस्तक देतांना त्यांना पत्र व्यवहाराद्वारे बायबल अध्ययन करण्यासाठी सांगा (पत्र व्यवहाराद्वारे बायबल अध्ययन करण्यासाठी पत्ता पुस्तकामध्ये दिलेला आहे).

ह्या पुस्तकाला फक्त तुमच्याकडेच ठेवून देऊ नका,
तर इतरांनाही ह्याचा आशीर्वाद प्राप्त होण्यासाठी द्या.

Print by : Ullhas Computer Services : 9823166323